१०३ शतकोत्तर वाटचाल

R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, शनिवार २३ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१७०, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL

• Vol.- 103, Issue - 170, Marathi - Daily - Mumbai, 23 August, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## मुस्लीम टोपीवरून नितीशकुमार वादात



**पाटणा -** बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. सर्वच राजकीय पक्ष आपापल्या मतदारांना चुचकारण्यात मग्न आहेत. अशात मुख्यमंत्री नितीशकुमार यांची एक चूक त्यांना चांगलीच भोवली आहे. नितीशकुमार यांनी मुस्लिमांची गोल टोपी परिधान करण्यास नकार दिला. त्यामुळे ते वादात आले आहेत. मुस्लीम समुदायाला आपल्याकडे खेचण्यासाठी नितीशकुमारांनी मुस्लीम नेत्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नितीशकुमार बिहार मदरसा शिक्षण मंडळाच्या एका कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिले. तिथे मंचावर त्यांना सन्मानार्थ अल्पसंख्याक कल्याण मंत्री जामा खान यांनी त्यांच्या डोक्यावर मुस्लिमांची गोल टोपी घालण्याचा प्रयत्न केला. मात्र नितीशकुमार यांनी त्यांच्या हातातील टोपी काढून घेतली आणि आपल्याऐवजी त्यांच्या डोक्यावर घातली. हा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला.

# भटक्या कुत्र्यांना दिलासा! त्याच जागी सोडणार सर्व राज्यांना निर्णय लागू! कुत्र्यांना नियोजित ठिकाणीच अन्न

**भटक्या कुत्र्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आज महत्त्वाचा निर्णय दिला. न्यायालयाने ११ ऑगस्टला दिलेल्या आपल्या निर्णयात ११ दिवसांतच दुरुस्ती करत पकडलेले भटके कुत्रे नसबंदी आणि लसीकरण करून जिथून पकडले त्याच जागेवर सोडून देण्याचा अंतरिम आदेश आज दिला. आधी न्यायालयाने भटक्या कुत्र्यांना सरसकट कायम निवारागृहांमध्ये ठेवण्याचे आदेश दिले होते. आजच्या निर्णयाने केवळ आजारी आणि पिसाळलेल्या कुत्र्यांनाच निवारागृहांमध्ये ठेवावे लागणार आहे. त्याचबरोबर कुत्र्यांना नियोजित ठिकाणीच अन्न देण्यास परवानगी दिली आहे. इतरत्र त्यांना खाऊ घातल्यास कारवाई केली जाईल. हा निर्णय सर्व राज्यांना लागू आहे. आता भटक्या कुत्र्यांसंदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवण्यासाठी सर्व उच्च न्यायालयातील संबंधित याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी होणार आहे.**



■ नवी दिल्ली

**न्या. विक्रम** नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या विशेष पीठाने सर्व पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर १४ ऑगस्ट रोजी आपला निर्णय राखून ठेवला होता. दिल्ली आणि एनसीआर भागात भटक्या कुत्र्यांच्या समस्येने भीषण स्वरूप घेतले आहे. सर्वोच्च न्यायालयाने याची स्वतःहून दखल घेत याचिका दाखल केली होती. यावरील सुनावणीनंतर दोन न्यायमूर्तींच्या पीठाने भटक्या कुत्र्यांमुळे होणारी जीवितहानी, रेबीजच्या घटनांमधील वाढीवर चिंता व्यक्त केली आणि दिल्ली-एनसीआरमधील रहिवाशी भागातील जवळपास ५ हजार भटक्या कुत्र्यांना पकडून आठ आठवड्यांत कायमस्वरूपी निवारागृहात पाठवण्याचे आदेश दिले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालावर सहमती आणि विरोधाचा असे दोन्ही सूर उमटले होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे अनेक दशकांपासून सुरू असलेल्या मानवीय आणि शास्त्रीय धोरणाला मागे खेचणारा निर्णय असल्याचे म्हटले होते. निवारागृह, नसबंदी, लसीकरण आणि सामुदायिक देखभाल या माध्यमातून त्यांना सुरक्षित ठेवले जाऊ शकते. यावर सरसकट बंदी ही क्रूर अदूरदर्शी आणि आपल्यातील करुणा संपवणारा निर्णय आहे असे म्हटले गेले. चित्रपट कलाकारांनीही या निर्णयाला विरोध केला. प्राणीप्रेमी संघटनांनीही सर्वोच्च न्यायालयात धाव घेत या आदेशाला स्थगिती देण्याची मागणी केली. यानंतर सरन्यायाधीश भूषण गवई यांनी स्वतः दखल घेत तत्काळ या प्रकरणाची सुनावणी तीन न्यायमूर्तींच्या विशेष पीठाकडे दिली होती. तीन न्यायमूर्तींच्या पीठानेही त्वरित सुनावणी घेत आज अंतरिम आदेश दिला की कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना परत सोडण्याच्या या दिशा निर्देशांच्या अंमलबजावणीत कुणीही अडथळे आणू नका. भटक्या कुत्र्यांना दत्तक घेण्यासाठी प्राणीप्रेमी व्यक्ती अर्ज करू शकतात. मात्र, दत्तक घेतलेल्या कुत्र्याला पुन्हा रस्त्यावर सोडता येणार नाही या अटीचे पालन करावे लागेल. न्यायालयाने कुत्र्यांना पकडण्यावर कोणतीही बंदी घातली नाही. कुत्रे पकडण्यास विरोध केल्यास २५ हजार ते २ लाखापर्यंतचा दंड आकारला जाईल, असे न्यायालयाने सांगितले.

याचिकाकर्त्यांच्या वकील ननिता शर्मा म्हणाल्या की, हा आदेश खूपच संतुलित आहे. न्यायालयाने सर्वच राज्यांचा या प्रकरणात समावेश केला आहे. सर्व राज्यांत कुत्र्यांशी संबंधित प्रलंबित असलेल्या सगळ्या याचिकांची आता एकत्र सुनावणी होईल. त्यामुळे सर्वच उच्च न्यायालयातील प्रकरणे आता सुप्रीम कोर्टाकडे वर्ग होतील. या याचिकेत पक्षकार होण्यासाठी व्यक्तीला २५ हजार रुपये, तर संस्थेला दोन लाख रुपये इतके शुल्क न्यायालयाच्या रजिस्ट्राकडे सात दिवसांत भरावे लागतील. याआधी ही याचिका केवळ दिल्ली

» पान ७ वर

## हिंदू नावे वापरू नका! मुस्लीम बँडवाल्यांना तंबी




**उत्तर प्रदेशमध्ये कावड यात्रेदरम्यान मुस्लीम दुकानदारांना स्वतःचे नाव फलकावर लिहिणे बंधनकारक केल्यानंतर मोरादाबाद शहरात आता मुस्लीम बँड पथकांना हिंदू नावे वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. मोरादाबाद पोलिसांनी तशी सूचना या बँड पथकांना दिली आहे.**

■ लखनौ

**मोरादाबादमध्ये** लहान-मोठी मिळून सुमारे ५०० बँड पथके आहेत. त्यापैकी प्रख्यात असलेल्या किमान २० बँड पथकांचे मालक मुस्लीम आहेत. या बँड पथक मालकांची नुकतीच मोरादाबाद पोलिसांनी बैठक घेऊन त्यांना बँड पथकांची हिंदू धर्मावरून असलेली नावे बदलण्याच्या सूचना दिल्या. यासंबंधी मोरादाबादमधील शावी सिंग या वकिलाने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या पोर्टलवर तक्रार केली होती. त्यांचा असा दावा होता की मुस्लीम बँड पथकांची हिंदू नावे असल्यास त्यामुळे हिंदूंची फसवणूक होते. काही बँड पथकांची नावे शर्मा आणि अगरवाल आहेत. काही बँड

» पान ७ वर

## ६५ लाख मतदारांना आधारसह नाव नोंदणीची संधी! कोर्टाचा आदेश

■ नवी दिल्ली

**बिहारमध्ये** मतदार याद्यांच्या सखोल पडताळणी मोहिमेदरम्यान (एसआयआर) वगळण्यात आलेल्या ६५ लाख मतदारांना आता आधारसह ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध झाली आहे. यासाठी राजकीय पक्षांना नाव वगळलेल्या मतदारांना सक्रियपणे मदत करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

आज झालेल्या सुनावणीवेळी आधारसोबतच इतर ११ कागदपत्रे नाव नोंदणीसाठी गृहित धरावीत, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले. प्रारूप मतदार यादीमधून



नाव वगळण्यात आलेल्या मतदारांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या ११ कागदपत्रांच्या यादीत आधारचा समावेश नव्हता. या प्रकरणी पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होईल.

न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाला बागची यांच्या पीठासमोर ही सुनावणी सुरू आहे. न्यायालयाने म्हटले की, प्रारूप मतदार यादीत नाव जोडण्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल. त्यासाठी प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज नाही. फॉर्म ६ मध्ये दिलेल्या ११ कागदपत्रांसोबतच आधार कार्डसह कोणतेही कागदपत्र सादर करता येते. यामध्ये वाहन परवाना,

» पान ७ वर

## सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण अखेर एसआयटी स्थापन

■ मुंबई

**परभणी** जिल्ह्यातील पोलीस कोठडीत झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी याच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटी स्थापन केली आहे. या चौकशी पथकात परभणीतील एकाही अधिकाऱ्याचा

**परभणीतील अधिकारी वगळले**

समावेश करण्यात आलेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मागील आठवड्यात राज्याच्या पोलीस महासंचालकांना या मृत्यू प्रकरणात ८ दिवसांत एसआयटी नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी एसआयटीची घोषणा केली.

याबाबत वंचित बहुजन आघाडीने आज एक्स पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी या एसआयटीचे अध्यक्ष म्हणून पुणे सीआयडीचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुधीर हिरेमठ यांना नियुक्त केले. तर नागपूर सीआयडीचे पोलीस अधीक्षक अभिजित धाराशिवकर आणि नांदेड सीआयडीचे पोलीस उपअधीक्षक अनिल गवाणकर यांचा सदस्य म्हणून समावेश

» पान ७ वर

## संभल मशीद वाद! जैसे थे स्थिती राखा

■ नवी दिल्ली

**उत्तर** प्रदेशातील संभल येथील मशीद वाद प्रकरणी २५ ऑगस्टपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्या. ए. एस. चांदूरकर व न्या. पी. एस. नरसिंहा यांच्या पीठाने हे निर्देश दिले आहेत.



**सुप्रीम कोर्टाचे निर्देश**

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका हिंदू पक्षाच्या वतीने सादर करण्यात आली होती. संभल मशीद प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले होते की, संभल मशीद ही धार्मिकस्थळे संरक्षण कायदा १९९१ च्या अंतर्गत येत नाहीत.

मुस्लीम पक्षाच्या विधिज्ञ हजेफा अहमदी यांनी म्हटले की, धार्मिक स्थळे संरक्षण कायद्याखाली हे प्रकरण येत नाही. यावर सर्वोच्च न्यायालयाने ही याचिकाही इतर याचिकांबरोबर सुनावणीसाठी घ्यावी का, अशी विचारणा केली. यावर हिंदू पक्षाच्या वतीने विष्णू शंकर जैन यांनी म्हटले की, ही वास्तू पुरातत्त्व खात्याच्या अंतर्गत संरक्षित असल्यामुळे ती धार्मिक स्थळे संरक्षण कायद्यामध्ये येणार नाहीत. या प्रकरणी याचिकाकर्त्यांना केवळ त्या मशिदीवर ताबा मिळवायचा आहे.

## शेतीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्याची आत्महत्या

■ चंद्रपूर

**चंद्रपुरातील** गोंडपिपरी तालुक्यातील अडेगावात एका शेतकऱ्याने किटकनाशक पिऊन आत्महत्या केली. पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाल्याच्या नैराश्यात शेतकऱ्याने हे टोकाचे पाऊल उचलले.



गणपत भाऊजी नागापुरे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ते अडेगावातील रहिवासी होते. त्यांच्याकडे ३ एकर शेती असून, गेली काही वर्षे अतिवृष्टी आणि पुरामुळे त्यांच्या शेतीचे मोठे नुकसान होत होते. यंदा त्यांनी ३ एकर जमिनीत कापूस, धान पेरले होते. मात्र, संततधार पावसामुळे वर्धा नदीला पूर आला. यात त्यांची शेती पाण्याखाली गेली. अजूनही त्यांचे शेत पाण्याखालीच आहे. मोठ्या कष्टाने फुलवलेल्या शेतीचे डोळ्यांदेखत नुकसान झालेले पाहून त्यांनी शेतात जाऊन कीटकनाशक औषध पिऊन आपले जीवन संपवले. त्यांच्या मृत्युने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## नक्षलग्रस्त गावात राष्ट्रध्वज फडकवल्याने तरुणाची हत्या

■ कांकेर

**छत्तीसगडमधील** नक्षलग्रस्त कांकेरच्या बिनागुंडा या गावात स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी भारतीय राष्ट्रध्वज फडकावल्याने मनीष नुरुटी (२४) या तरुणाची हत्या करण्यात आली. या धक्कादायक घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

१५ ऑगस्ट रोजी बिनागुंडा गावात मनीष आणि मंदिरातील इतर ग्रामस्थांनी भारत माता की जयच्या घोषणा देत राष्ट्रध्वज फडकवला. या कार्यक्रमाचा व्हिडिओ व्हायरल झाला. हा व्हिडिओ नक्षलवाद्यांपर्यंत



पोहचल्यानंतर दुसऱ्या दिवशी नक्षलवादी गावात आले. त्यांनी गावकऱ्यांसमोर जनअदालत भरवली. त्यामध्ये नक्षलवाद्यांकडून राष्ट्रध्वज अभिमानाने फडकवणाऱ्या मनीष आणि दोन इतर दोघांना आरोपी ठरवले.

या बैठकीत मनीषवर पोलिसांचा हेर असल्याचाआरोप ठेवून त्याची गळा दाबून हत्या करण्यात आली. तर इतर दोघांना बेदम मारहाण केली. पोलिसांनी मनीष हेर नसल्याचे स्पष्ट केले असून त्याच्या हत्येचा तपास चालू केला आहे.

## मुंबई, पुणे, पिंपरी, नाशिक पालिका निवडणुकांसाठी प्रभाग रचना जाहीर

■ पुणे

**अनेक** वर्षांपासून रखडलेल्या मुंबई, पुणे, पिंपरी, नवी मुंबई, नाशिक, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकांसाठी २०१७ च्या निवडणुकीप्रमाणेच प्रभाग रचना जाहीर केली. हरकती आणि सूचना ४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत लेखी स्वरुपात स्वीकारल्या जाणार आहेत. मुंबई महापालिकेने आगामी निवडणुकीसाठी आज रात्री उशिरा २२७ प्रभाग रचना प्रसिद्ध केली. या प्रभागात एकच सदस्य असणार आहे. प्रभाग रचना जाहीर झाल्यामुळे महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजल्याचे समजले जात आहे.

पुणे महापालिकेने आगामी निवडणुकीसाठी ४१ प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली. यातील ४० प्रभाग प्रत्येकी ४ आणि एक प्रभाग ५ सदस्य असणार आहे. या महापालिकेतील नगरसेवकांची संख्या १६५ कायम राहणार आहे. आंबेगाव-कात्रज हा लोकसंख्येनुसार सर्वात मोठा (१,१४,९७०) आणि अप्पर सुपर इंदिरानगर हा सर्वात लहान (७५,९४४) प्रभाग असणार आहे. या प्रभागरचनेनुसार कळस-धानोरी हा पहिल्या क्रमांकाचा प्रभाग असणार आहे. महंमदवाडी-उंड्री हा शेवट म्हणजेच ४१ नंबरचा प्रभाग असणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रारुप

» पान ५ वर

## ओपन एआयचे नवी दिल्लीत पहिले कार्यालय! कर्मचारी भरतीही सुरु

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षेत्रातील चॅटजीपीटीची मूळ कंपनी ओपन एआय भारतात यावर्षाखेरीस पहिले कार्यालय सुरू करणार आहे. त्यासाठी कंपनीने कर्मचारी भरतीला सुरुवातही केली आहे.**

■ नवी दिल्ली

**ओपन** एआय कंपनीने भारतात कायदेशीर नोंदणी पूर्ण करून प्रज्ञा मिश्रा यांची सार्वजनिक धोरण प्रमुख




आणि ऋषी जेटली यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. हे दोघेही भारत सरकारसोबत धोरणात्मक चर्चेसाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. ओपन एआयचे सह-संस्थापक आणि सीईओ सॅम ऑल्टमन म्हणाले की, मागील वर्षभरात चॅटजीपीटी वापरकर्त्यांची संख्या चारपट वाढल्याने भारत ओपन एआयसाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ ठरली आहे. भारतामध्ये एआयसंदर्भातील उत्साह आणि संधी मोठ्या प्रमाणात आहेत. भारताकडे जागतिक एआय नेतृत्वासाठी आवश्यक उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य असलेली तरुणाई, जागतिक दर्जाची डेव्हलपर इकोसिस्टम आणि इंडिया एआय मिशनद्वारे

» पान ७ वर

## घुसखोरांना देशाबाहेर हाकलणार एसआयआरवरून मोदींचा निर्धार

■ गया

**पंतप्रधान** मोदींनी आज बिहारमध्ये १३,००० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपुजन केल्यानंतर गया येथे एका जनसभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी नवीन घटनादुरुस्ती विधेयकांवरही भाष्य केले. त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहारमध्ये सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणी मोहिमेवरून विरोधकांवर निशाणा साधला. या मोहिमेचा उल्लेख न करता ते म्हणाले की, आम्ही घुसखोरांना देशातून हाकलून लावू.

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मतदारयाद्यांची पडताळणी सुरू आहे. मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाची ही मोहीम असल्याचे सांगितले जात आहे. हाच धागा पकडत मोदी म्हणाले, आम्ही घुसखोरांना देशातून हाकलून लावू. आम्ही त्यांना तुमचे हक्क लुटू देणार नाही. काँग्रेस-राजद घुसखोरांच्या पाठीशी उभे आहेत. बिहारच्या भूमीतून घेतलेला कोणताही संकल्प व्यर्थ जात नाही. पहलगाम हल्ल्यानंतर मी बिहारमधून वचन दिले होते, की मी दहशतवाद्यांना संपवेन. तो संकल्प पूर्ण झाला.

३१ दिवस कोठडीत राहिल्यास पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री यांच्या हकालपट्टीसाठी मोदी सरकारने संसदेत विधेयक मांडले आहे. याबद्दल पंतप्रधान म्हणाले, आधी लोक तुरुंगात बसून फायलींवर सही करायचे. आम्ही असे विधेयक आणले आहे, ज्यामध्ये पंतप्रधानांचाही समावेश आहे. त्यांना अटक होताच पदही सोडावे लागेल.

## बेस्ट निवडणूक पराभवानंतर सुहास सामंतांचा राजीनामा

■ मुंबई

**दि** बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत उबाठा-मनसे आघाडीचा पराभव झाला. ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनेलला एकही जागा जिंकता आली नाही. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी आज पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा दिला. भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी सुहास सामंत यांच्यावर जवळपास २४ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप केला होता. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने बेस्टच्या २१ संचालकांना चौकशीसाठी नोटीस दिल्याचा दावा लाड यांनी केला. या सर्व घडामोडींनंतर आज सुहास सामंत यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारलेला आहे किंवा नाही याबाबत माहिती मिळालेली नाही.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

HDFC बँक जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार: 17500-35000 संपर्क : **7758908779** {NC251939}

मुंबई, ठाणेमध्ये पेशंटकेअर होम ड्यूटीसाठी आया, बाई, वॉर्डबॉय पाहिजेत. **8291860224 / 82911 52695** {NC251989}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोड येथे सफाई कर्मचारी बाई/पुरुष पाहिजेत. **8828827772** {NC252003}

अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर विलेपार्ले पार्लरसाठी अनुभवी मुलगी पाहिजे **9029779889** {NC252017}

लॅमिनेशन मशीन ऑपरेटर आणि डीटीपी ऑपरेटर पाहिजेत, संपर्क सिस्टम्स, 1, चुनावाला इंडस्ट्रियल इस्टेट, कोंडीविटा लेन, अंधेरी पुर्व, **9920982277 / 8591182277.** {NC252009}

बदलापूर येथे राहण्यासाठी २४ तासांची महिला आवश्यक आहे. पगार/ जेवण/ वेगळी खोली. **8446201979/ 9167891007.** {NC252013}

प्रिंटींग प्रेससाठी प्रॉडक्शन मॅनेजर, फिडरमन आणि प्रिंटर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **8591420902** {NC252016}

सिक्युरिटी गार्डस पाहिजेत. पगार १५,०००, शिक्षण, अनुभव, वयाची अट नाही. **9930160716** {NC252015}

लोअरपरेल डेलीवेजेस रोज 600/- बुधवारी पगार, ट्रेनपास + ओव्हरटाईम, काम 8 ते 5, बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांनी संपर्क **9821819036, 9320080200** {NC252005}

मालवण येथे अनुभवी स्थानिक महिला स्वयंपाकी (लेज्ञ), रूमबॉय, आणि रिसेप्शनिस्ट पाहिजेत, संपर्क : **9423954861** {NC251981}

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC252043}

डिलिव्हरी बॉय/गर्ल पार्ट/फुलटाईम DTDC कुरियर शॉप 1/2, शिंदे निवास, कार्टर रोड, नंबर 6, बोरिवली ईस्ट **9323766047 / 8451015519** {NC251988}

कांदिवली ऑफिसमध्ये टायपिंग कामासाठी मुलगी/बाई पाहिजे. **9004502451** {NC252023}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणस पगार 12000/- पास फ्री. आधारकार्ड / रेंट अग्रीमेंट / ऍड्रेसप्रुफ - सकाळी 7 - 4. - मोबाईल - **9324681781** {NC251984}

गोरेगावमध्ये फिमेल ऑफिस असिस्टंट पाहिजे सॅलरी 12 ते 15000 संपर्क- **8055772679 / 9320176123** {NC251965}

सांताक्रूझ/गोरेगांवमध्ये मेडिकल डिलिव्हरी बॉय पाहिजे. (फक्त बाईक चालक) - **8928377811** {NC252000}

दादर (पश्चिम) सोने पेढीसाठी अनुभवी सेल्समन/सेल्सगर्ल त्वरीत पाहिजेत. आकर्षक पगार जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. बायोडेटासह 11-1/5-8 भेटा - 'एम. व्ही. पेंडुरकर ज्वेलर्स', शॉप नंबर 1, चोकसी बिल्डिंग, डिसिल्व्हा हायस्कूल ग्राऊंडसमोर, रानडे रोड, दादर (पश्चिम). {NC252018}

विलेपार्ले पूर्व डिस्पेंसरीसाठी मुलगी पाहिजे. शक्यतो जवळपास राहणारी, वेळ दुपारी 3.30 ते 6.00 वाजेपर्यंत. संपर्क **9323590099** {NC252019}

मुलुंड येथे ऑटोमॅटिक/मॅन्युअल गाडीसाठी अनुभवी, निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. **9821053047** {NC252020}

पाहिजेत - (Female) अकाऊंट एक्झिक्युटिव्ह रिअल इस्टेट फर्मसाठी, दादर (पश्चिम). पगार- 10,000/- संपर्क राजेश - **8976517100.** {NC252021}

## पाहिजेत

ओसवाल ड्रायफ्रूट्स, मशीद बंदर येथील राशनच्या दुकानात काम करण्यासाठी पुरुष/महिला कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. अनुभव: कोणताही अनुभव आवश्यक नाही. अनुभव असेल तर पहिली पसंती पगार: रु. 14,000 ते रु. 20,000 पर्यंत. वय: 25 ते 40 वर्षे. वेळ: सकाळी 10 ते रात्री 9 वाजेपर्यंत. संपर्क: दुपारी 2 ते सायंकाळी 5 **9820029433** {NC252022}

नामांकित प्रिंटींग प्रेससाठी मार्केटिंग / टेलिमाकेर्टिंग एक्झीक्युटीव्ह, पंचिंग ऑपरेटर्स, ऑफिस असिस्टंट, डिलीव्हरीबॉय. भांडुप : **8779203935 / 9867338302.** {NC252024}

**पाहिजेत**
मुंबई, ठाणे, नवी मुंबई व उर्वरित कोकणात नामांकित कंपनीला कुशल जबाबदार व ऊर्जावान उमेदवार हवेत.
**ड्रायवर**
- वैध LMV (Light Motor Vehicle) ड्रायव्हिंग लायसन्स
- स्थानिक रस्त्यांची चांगली माहिती
- सुरक्षित व वेळेत गाडी चालविण्याची सवय

**लॅब असिस्टंट**
- प्रयोग शाळेतील मूलभूत कामकाजाचे ज्ञान
- वैध LMV (Light Motor Vehicle) ड्रायव्हिंग लायसन्स
- शिकण्याची व टीमसोबत काम करण्याची तयारी

- *इंग्रजी, हिंदी व मराठी वाचन आवश्यक*
- *किमान १०वी उत्तीर्ण*
- *आकर्षक पगार व सुविधा*
- *लवचिक वेळ/ निश्चित वेळ पर्याय*
- *तात्काळ जॉइनिंग ला प्राधान्य*
- *कोणतेही नोंदणी शुल्क नाही*
- *निवड झाल्यास ट्रेनिंग सहित राहत्या घरा जवळ थेट भरती.*

संपर्क: **9225541056**
ईमेल: **buthellotransport@gmail.com**
ऑफिस पत्ता: शॉप न. 1, शेल्टर अपा, प्रीमियर रोड, कुर्ला (प.), मुंबई.

दादर (पश्चिम) येथे महाराष्ट्रीयन 2 जणांच्या कुटुंबासाठी 24 तासांसाठी घरकाम व शाकाहारी/मांसाहारी स्वयंपाक करणारे 30 ते 45 वयोगटातील पुरुष पाहिजेत. पगार 12000/- संपर्क - **9324388020** चेतन ट्रेडर्स, सी-12, शॉप नं. 02, कस्तुरचंद मिल कंपाऊंड, लक्ष्मी कमर्शियल बिल्डींगच्या पाठीमागे, मनीष मार्केटजवळ, से. बापट मार्ग, दादर (वेस्ट ){NC252025}

कॉम्प्युटर ऑपरेटरसाठी मुलगी पाहिजे दुकान क्र. 19, आकांक्षा टॉवर, स्टेशनजवळ, नालासोपारा पूर्व. **9321724861** {NC252028}

गोरेगांव (पूर्व) कंपनीसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर मुली/ मुले पाहिजे आहेत. **8652006838** {NC252027}

तुर्भेमध्ये प्रिंटिंग प्रेसकरिता बॉयलर. फिडरमेन, बायंडर, पीनींग मशीन ऑपरेटर व प्रोडक्शन सुपरवायझर पाहिजे. **9324810141** {NC252029}

दादर पश्चिम 24 तास घरकामासाठी बाई 20 ते 40 वय पाहिजे **9892458244 / 9967236997** {NC252030}

12 तास घरकाम व जेवण बनवण्यासाठी मुली/मुले पाहिजेत - मालाड (पूर्व/पश्चिम) **9324596095/9323157573** {NC252031}

## पाहिजेत

**रेल्वे स्टेशनजवळ आमच्या ऑफिससाठी ऑफिस बॉय पाहिजेत हाऊसकीपिंग आणि ऑफिसच्या कामाकरीता. भेटा: सकाळी 11 ते 6 पर्यंत, 1304 B, नमन मिडटाऊन, सेनापति बापट मार्ग, इंडियाबुल्स फाइनेंसचा बाजूला, प्रभादेवी (पश्चिम).** {NC252032}

बोरीवली (वेस्ट) COMPUTER जाणणार तसेच ऑफिसकरिता फिमेल पाहिजेत. (HSC पास) jobsrkenterprise@gmail.com {NC252033}

इलेक्ट्रीशियन पाहिजेत. बोरीवली - कांदिवलीसाठी (पगार 18,000/-) - **9920653049** {NC252034}

पाहिजेत: ग्रान्टरोड सुपर मार्केटसाठी डेटा एन्ट्री आणि अकाउंटंट, डिलिव्हरी बॉय, पॅकिंग डिपार्टमेंट मुलगा/ मुलगी - वय 20-35. संपर्क : **9821030892.** {NC252035}

पाहिजेत ऑफिसबॉय आणि मेल/फिमेल स्टाफ ऑफिस ॲडमिनिस्ट्रेटिव्हसाठी (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक) मालाड ऑफिससाठी पाहिजेत. बायोडेटासह भेटा - मोनार्क फार्माकेम, 412 जेमस्टार कॉम्प्लेक्स, रामचंद्र लेन एक्सटेंशन, मालाड (पश्चिम), संपर्क - **022-49771011-12-13** {NC252036}

चर्नीरोडमधील चार्टर्ड अकाऊंट कंपनीला अनुभवी/फ्रेश अकाऊंटंट पाहिजे. जिगर मोदी अँन्ड कंपनी - **9773500278** {NC252037}

ऑफिस कामासाठी अनुभवी मुलगा त्वरित पाहिजे. PH - **9821244685 / 9223268970** {NCC250054}

हॉस्पिटल मेंटनेससाठी अनुभवी PWD इलेक्ट्रिक वायरमन त्वरित पाहिजेत. PH - **9821244685 / 9223268970** {NCC250055}

त्वरित भरती सेक्युरिटी गार्ड - ठाणे/मुलुंड सोसायटीसाठी ड्युटी 8 तास पगार 10,000 - **9004883251** {NC252038}

मिठाईच्या दुकानात हाऊसकिपिंगसाठी तरुण अनुभवी मुले पाहिजेत. 12 तास 17400 घाटकोपर, **9699927271** {NC252039}

सिंगल कलर आणि 2 कलर ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी प्रिंटर आणि बॉयलर पाहिजे. भिवंडी -**9594976494** {NC252040}

DRM - मुंबई सेंट्रल - ऑफिस साफसफाई वेळ : 7 ते 4 वयोमर्यादा - 40. आधारकार्ड / रेशनकार्ड इत्यादी पगार - 16000/- मोबाईल : **9324681781** {NC252041}

बालाजी पॅकेजींग पंचिंग ऑपरेटर पाहिजे. पगार : 16000/- वसई स्टेशन. - **8668691237 / 9764314986** {NC252042}

## Situation Vacant

REQUIRED MALE/ FEMALE OFFICE ASSISTANT (EXCEL & WORD) AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616** {NC252004}

Hiring Deep Cleaners Hallmark Services, in Mumbai, is looking for Deep Cleaners on a per-day basis. contact: Mr. Ravi K – **+91 9930620774** or Mr. Rakesh S - **+91 9833025532.** {NC252010}

Join Hallmark Services! We're hiring Housekeepers, Butlers, Pantry Boys, Supervisors in Mumbai. Contact Mr. Rajesh: Ph: **+91 9930620774.** {NC252011}

WALK-IN Interview Packer & Picker—Minimum 10th Pass. Venue: BGTA B-7, Shayadri, 2nd Floor, Room No. 208, Wadala RTO, Wadala Truck Terminal, Mumbai— 37. Timing: 10:00 AM — 6:00 PM, Salary: ₹13,000 — ₹15,000. Walk-in directly with documents. Number : **9920807977/ 9326257887** {NC252026}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## गुंतवणूक विषयक

आमच्या जीवन विम्यात गुंतवणुक करून अनिश्चितेच्या आणि फसवणुकीच्या जगात मिळवा जीवनाची सुरक्षा आणि पैशांच्या समृद्धीची दुहेरी खात्रीलायक योजना - **9373956687** {NC251993}

## कर्ज विषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्ड वर गॅरेंटेड लोन मिळवा 4 दिवसांत **8450983443** {NC252043}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251966}

## वधु वर मेळावा

सर्व जाती, कोकणस्थ, देशस्थ खानदेश कल्याण - **9869868620** {NC251999}

## आजचे राशी भविष्य

शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | मनामध्ये एखादी चिंता सतावेल. घरासंबंधीचे कागदपत्रांबाबत अडचणी येऊ शकतात. काहींना अचानक प्रवासाचे योग. |
| वृषभ | तुम्ही केलेल्या योजना लांबणीवर पडण्याची शक्यता. भावंडांच्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. |
| मिथुन | व्यवसायामध्ये सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. तुमच्या बोलण्याने काही गोष्टी मार्गी लागू शकतात. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. |
| कर्क | व्यवसायामध्ये आर्थिक स्थित्यंतरे जाणवतील. नोकरीनिमित्त प्रवास घडेल. कुटुंबियांची काळजी वाटेल. |
| सिंह | कार्यक्षेत्रात स्वतःच सगळी कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. जोडीदाराशी वादविवाद टाळावेत. खर्चाचे प्रमाण वाढेल. |
| कन्या | मनामध्ये सकारात्मक विचार ठेवा. मित्रमंडळींचे सहकार्य राहील. आरोग्याच्या तक्रारी निर्माण होतील. |
| तूळ | व्यवसायामध्ये नवीन संधी मिळण्यासाठी थोडे थांबावे लागेल. आर्थिक व्यवहार लांबतील. नोकरीमध्ये परिश्रम घ्यावे लागतील. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. आर्थिक व्यवहार करताना खबरदारी घ्यावी. मालमत्तेसंबंधी कामे हळूहळू सुरू होतील. |
| धनु | कार्यक्षेत्रात अधिक मेहनत घ्यावी लागेल. सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| मकर | व्यवसायामध्ये अचानक घडामोडी होतील. नोकरीत नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. आरोग्यासाठी खाण्याची पथ्ये सांभाळावी लागतील. |
| कुंभ | नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. मुलांची चिंता वाटेल. जोडीदाराच्या आरोग्याच्या तक्रारी उद्भवतील. |
| मीन | नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागेल. अधिक मेहनत करावी लागेल. सरकारी क्षेत्रात कामे करताना अडचणी उद्भवू शकतात. |

# ट्रेडिंग गुरू अवधूत साठेंच्या अकादमीवर सेबीचा छापा

■ मुंबई

**शेअर** बाजारावरील फायनान्शिअल इन्फ्लुएन्सरवर कारवाईचा बडगा उगारत सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने प्रसिद्ध ट्रेडिंग गुरू अवधूत साठे यांच्या कर्जत येथील अकादमीवर छापा टाकला. बुधवारी सकाळी सुरू झालेली ही कारवाई काल संध्याकाळपर्यंत चालली.



अवधूत साठे हे यूट्यूब चॅनेल आणि सेमिनारद्वारे लोकांना शेअर बाजाराचे ज्ञान देतात. यूट्यूबवर त्यांच्या नऊ लाखांहून अधिक सबस्क्रायबर्स आहेत. विविध सेमिनार आणि डिजिटल माध्यमांद्वारे ते शेअर बाजारातील गुंतवणूक धोरणे, बाजार विश्लेषण व चार्ट पॅटर्न या विषयी मार्गदर्शन करत असतात. त्यांच्या विरोधात गुंतवणूकदारांना दिशाभूल केल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. गेल्या महिनाभरापासून साठे हे सेबीच्या रडारवर होते. सेबीच्या अंमलबजावणी पथकाने २० ऑगस्टला न्यायालयाची मंजुरी घेऊन अकादमीवर धडक कारवाई केली. उपमहाव्यवस्थापकांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांनी कार्यालयातून डिजिटल उपकरणे, ट्रेडिंग संबंधित आकडेवारी व महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली. जप्त केलेल्या सर्व डेटाची फॉरेन्सिक तपासणी होणार आहे.

# एल्विश यादवच्या घरावर गोळीबार करणाऱ्याला अटक

■ फरिदाबाद

**यूट्यूबर** आणि बिग बॉस ओटीटी-२ विजेता एल्विश यादवच्या गुरुग्राम येथील घरावर रविवार १७ ऑगस्टला गोळीबार करण्यात आला होता. हा गोळीबार करणाऱ्या आरोपी इशांत ऊर्फ इशू गांधीला फरिदाबाद गुन्हे शाखेने अटक केली.

इशांतला पकडताना पोलिसांची त्याच्याबरोबर चकमक उडाली. या चकमकीत त्याच्या पायात गोळी लागली. त्याला पकडल्यानंतर उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एल्विशच्या घरावर गोळीबार झाल्यानंतर, सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यामध्ये सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तीन दुचाकीस्वारांनी एल्विशच्या घरावर तब्बल १२ गोळ्या झाडल्याचे दिसते. हल्ल्यावेळी एल्विश घरी नव्हता. फक्त त्याची आई सुषमा यादव, वडील रामावतार घरी होते. हल्ल्याची जबाबदारी कुख्यात हिमांशू भाऊ टोळीने एका इन्स्टाग्राम पोस्टद्वारे स्वीकारली होती.

# शेअर बाजारात घसरण

■ मुंबई

**आज** आठवड्याच्या अखेरच्या सत्रात देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण झाली. त्याआधी अनुभवलेल्या सलग सहा दिवसांच्या तेजीला त्यामुळे ब्रेक लागला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ६९३.८६ अंकांच्या मोठ्या घसरणीसह ८१,३०६.८५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २१३.६५ अंकांनी घसरून २४,८७०.१० अंकांवर बंद झाला. आजच्या घसरणीत एशियन पेंट्स, अल्ट्राटेक सिमेंट, टाटा स्टील, आयटीसी आणि एचसीएल टेक या कंपन्यांचे समभाग सर्वाधिक गडगडले. दुसरीकडे महिंद्रा अँड महिंद्रा, मारुती सुझुकी, भारत इलेक्ट्रिकल्स लिमिटेड, भारती एअरटेल आणि सन फार्मा या कंपन्यांच्या समभागांमध्ये माफक वाढ झाली.

# भजनी मंडळांना २५ हजारांचे अनुदान

■ मुंबई

**राज्यभरातील** १,८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी २५,००० रुपयांचे भांडवली अनुदान मिळणार आहे. यंदा प्रथमच गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

# विरुद्ध विचारसरणीमुळे राधाकृष्णनना पाठिंबा नाही

## शरद पवारांची भूमिका

■ मुंबई

**विरुद्ध** विचारसरणीमुळे उपराष्ट्रपतिपदासाठी एनडीएचे उमेदवार असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा देणे शक्य नाही. हे आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितल्याची माहिती आज शरद पवार यांनी दिली. पत्रकार परिषदेत शरद पवार म्हणाले की, उपराष्ट्रपतिपदाचे एनडीएचे उमेदवार महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. त्यामुळे त्यांना पाठिंबा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता. परंतु विरुद्ध विचारसरणीमुळे त्यांना पाठिंबा देणे शक्य नसल्याचे सांगितले. राधाकृष्णन झारखंडचे राज्यपाल होते तेव्हा मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राजभवनातून अटक झाली होती. आमच्याकडे मतदार कमी आहेत, हे आम्हाला माहीत आहे. मात्र आम्हाला निकालाची चिंता नाही. उपराष्ट्रपती निवडणुकीत आमच्याकडे लोकसभा आणि राज्यसभा मिळून मतदार ठरलेले आहेत. आमचा उमेदवार विजयी होईल एवढी संख्या आमच्याकडे नाही. त्यामुळे बाकीचे उद्योग आम्ही करत बसणार नाही. मते कमी असली तरी आम्ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. ते पुढे म्हणाले की, बिहारमध्ये राहुल गांधी यांच्या मतदार अधिकार यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. बिहार आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. परंतु ते राज्य राजकीयदृष्ट्या जागृत आहे. मतदार यादीबाबत आमचा अभ्यास सुरू आहे. परंतु निवडणूक आयोग स्पष्ट माहिती देण्यात तयार नाही. यासंदर्भात पहिल्यांदाच ३०० खासदार संसदेबाहेर रस्त्यावर उतरले होते.

# पहलगाममध्ये ठार झालेल्यांच्या कुटुंबियांशी अमित शहांची भेट

■ कोची

**जम्मू**-काश्मीरमधील पहलगाम येथे एप्रिल महिन्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे बळी ठरलेले एन. रामचंद्रन यांच्या कुटुंबियांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज कोची येथे भेट घेतली. या भेटीदरम्यान शहा यांनी त्यांच्या पत्नी व मुलीशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. एन. रामचंद्रन पत्नी शीला, मुलगी आरती आणि जुळ्या मुलांसह काश्मीरमध्ये सुट्टीसाठी गेले होते. मात्र ही सुट्टी त्यांच्या कुटुंबासाठी एक भयावह अनुभव ठरली होती. पहलगाम दहशतवाद्यांनी हल्ला करून ६५ वर्षीय रामचंद्रन यांची गोळ्या झाडून हत्या केली.


BMS Online वर सरू • फोन बुकिंग : ९१६७२७५५३०
**आज** दुपारी ४ श्री शिवाजी मंदिर, दादर (दोन्ही ति. वि. सुरू)
७५) अमृत महोत्सवी प्रयोग (७५
**उद्या** दुपारी ४ दिनानाथ नाट्यगृह, पार्ले




प्रसाद खांडेकर, भाग्यश्री मिलिंद, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर, नम्रता संभेराव
प्रयोगासाठी संपर्क 9867877651, 9869438887


## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 22/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- **GL-00 : 1072** सुमित एजन्सी - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2111 | 3253 | 3467 | 3509 | 5748 | 6049 | 7080 | 9248 | 9779 | 9914 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1987 | 3645 | 5066 | 5868 | 5899 | 5955 | 8480 | 8625 | 9515 | 9825 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0180 | 0904 | 0951 | 2698 | 3384 | 5960 | 8624 | 9069 | 9346 | 9771 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1158 | 1957 | 2998 | 3900 | 4754 | 5646 | 6604 | 7427 | 8216 | 9202 |
| 0013 | 1164 | 2091 | 3015 | 3934 | 4771 | 5652 | 6608 | 7441 | 8299 | 9209 |
| 0023 | 1173 | 2092 | 3135 | 3946 | 4810 | 5705 | 6668 | 7477 | 8310 | 9262 |
| 0110 | 1180 | 2094 | 3172 | 4134 | 4845 | 5725 | 6766 | 7558 | 8340 | 9334 |
| 0135 | 1199 | 2130 | 3203 | 4181 | 4850 | 5783 | 6782 | 7669 | 8384 | 9349 |
| 0236 | 1201 | 2143 | 3211 | 4196 | 4856 | 5815 | 6801 | 7675 | 8521 | 9361 |
| 0300 | 1231 | 2214 | 3222 | 4239 | 4874 | 5859 | 6846 | 7698 | 8528 | 9609 |
| 0334 | 1293 | 2268 | 3234 | 4261 | 4954 | 5888 | 6926 | 7718 | 8675 | 9645 |
| 0357 | 1310 | 2283 | 3238 | 4263 | 5058 | 5950 | 6965 | 7724 | 8690 | 9652 |
| 0399 | 1318 | 2292 | 3257 | 4279 | 5108 | 6046 | 6967 | 7776 | 8768 | 9679 |
| 0400 | 1346 | 2335 | 3275 | 4334 | 5136 | 6069 | 7037 | 7790 | 8770 | 9759 |
| 0553 | 1397 | 2336 | 3295 | 4343 | 5138 | 6116 | 7078 | 7806 | 8783 | 9766 |
| 0554 | 1491 | 2463 | 3302 | 4366 | 5152 | 6145 | 7082 | 7812 | 8808 | 9805 |
| 0665 | 1512 | 2602 | 3305 | 4406 | 5197 | 6150 | 7151 | 7853 | 8820 | 9882 |
| 0823 | 1537 | 2608 | 3311 | 4451 | 5222 | 6156 | 7159 | 7916 | 8861 | 9896 |
| 0830 | 1640 | 2610 | 3367 | 4469 | 5351 | 6358 | 7226 | 7953 | 8886 | 9907 |
| 0869 | 1652 | 2685 | 3368 | 4501 | 5447 | 6375 | 7270 | 8022 | 8898 | 9927 |
| 0903 | 1731 | 2746 | 3508 | 4514 | 5494 | 6385 | 7289 | 8054 | 9050 | 9944 |
| 0938 | 1803 | 2824 | 3572 | 4538 | 5503 | 6414 | 7320 | 8104 | 9109 | 9950 |
| 1080 | 1846 | 2841 | 3739 | 4644 | 5545 | 6538 | 7360 | 8119 | 9135 | 9959 |
| 1107 | 1876 | 2932 | 3831 | 4691 | 5625 | 6566 | 7412 | 8201 | 9179 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## — लॉटरी —

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 34 • सोडत दिनांक 22/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख **VL-07 : 6163**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- **4761** अंबिका एजन्सी - दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1578 | 2461 | 4057 | 4198 | 4303 | 5223 | 6166 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1030 | 2593 | 3165 | 3629 | 3840 | 4744 | 5656 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1419 | 1944 | 2762 | 5597 | 5746 | 5769 | 7033 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1216 | 2986 | 4129 | 4646 | 5117 | 5886 | 6417 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1916 | 2370 | 2958 | 3488 | 3991 | 4466 | 4999 | 5520 | 5865 | 6551 | 6947 | 7513 |
| | | 1920 | 2375 | 2965 | 3489 | 3998 | 4467 | 5008 | 5523 | 5875 | 6561 | 6961 | 7519 |
| | | 1921 | 2383 | 2976 | 3498 | 4000 | 4471 | 5014 | 5524 | 5886 | 6566 | 6963 | 7537 |
| 1010 | 1454 | 1941 | 2421 | 2980 | 3534 | 4004 | 4497 | 5028 | 5526 | 5905 | 6567 | 6968 | 7554 |
| 1016 | 1477 | 1960 | 2423 | 2982 | 3580 | 4034 | 4500 | 5068 | 5549 | 5908 | 6582 | 6992 | 7573 |
| 1071 | 1480 | 1981 | 2424 | 3003 | 3586 | 4040 | 4515 | 5076 | 5551 | 5938 | 6583 | 7001 | 7575 |
| 1077 | 1483 | 1988 | 2426 | 3012 | 3597 | 4042 | 4520 | 5110 | 5555 | 5946 | 6586 | 7003 | 7577 |
| 1093 | 1488 | 2023 | 2428 | 3033 | 3621 | 4045 | 4538 | 5161 | 5556 | 5953 | 6600 | 7005 | 7581 |
| 1109 | 1516 | 2024 | 2444 | 3036 | 3654 | 4046 | 4565 | 5178 | 5559 | 5995 | 6604 | 7035 | 7585 |
| 1114 | 1534 | 2026 | 2462 | 3039 | 3663 | 4071 | 4603 | 5185 | 5561 | 6018 | 6607 | 7043 | 7597 |
| 1119 | 1542 | 2030 | 2469 | 3043 | 3668 | 4079 | 4621 | 5192 | 5567 | 6064 | 6614 | 7067 | 7607 |
| 1124 | 1548 | 2031 | 2512 | 3049 | 3682 | 4100 | 4627 | 5200 | 5568 | 6066 | 6616 | 7100 | 7692 |
| 1132 | 1561 | 2082 | 2523 | 3050 | 3693 | 4110 | 4628 | 5206 | 5580 | 6079 | 6618 | 7127 | 7697 |
| 1134 | 1578 | 2084 | 2564 | 3063 | 3716 | 4124 | 4650 | 5208 | 5585 | 6121 | 6630 | 7128 | 7707 |
| 1163 | 1581 | 2111 | 2581 | 3084 | 3730 | 4145 | 4654 | 5214 | 5604 | 6147 | 6632 | 7147 | 7714 |
| 1165 | 1587 | 2115 | 2593 | 3123 | 3732 | 4190 | 4657 | 5235 | 5611 | 6198 | 6636 | 7173 | 7717 |
| 1181 | 1588 | 2117 | 2615 | 3132 | 3733 | 4205 | 4691 | 5285 | 5620 | 6228 | 6642 | 7178 | 7718 |
| 1183 | 1599 | 2130 | 2616 | 3139 | 3759 | 4221 | 4713 | 5307 | 5627 | 6231 | 6643 | 7183 | 7728 |
| 1197 | 1606 | 2133 | 2628 | 3170 | 3761 | 4242 | 4722 | 5308 | 5634 | 6246 | 6652 | 7202 | 7733 |
| 1199 | 1611 | 2148 | 2666 | 3183 | 3782 | 4247 | 4755 | 5316 | 5638 | 6249 | 6666 | 7207 | 7735 |
| 1201 | 1629 | 2172 | 2690 | 3208 | 3784 | 4254 | 4769 | 5325 | 5655 | 6267 | 6677 | 7219 | 7737 |
| 1205 | 1660 | 2201 | 2696 | 3237 | 3796 | 4256 | 4780 | 5338 | 5697 | 6279 | 6681 | 7230 | 7739 |
| 1207 | 1696 | 2208 | 2723 | 3286 | 3807 | 4311 | 4787 | 5345 | 5708 | 6283 | 6688 | 7247 | 7748 |
| 1211 | 1707 | 2212 | 2748 | 3308 | 3829 | 4320 | 4800 | 5349 | 5713 | 6295 | 6706 | 7272 | 7754 |
| 1212 | 1708 | 2213 | 2802 | 3318 | 3830 | 4403 | 4804 | 5355 | 5720 | 6313 | 6732 | 7274 | 7760 |
| 1221 | 1743 | 2217 | 2808 | 3323 | 3833 | 4404 | 4815 | 5371 | 5721 | 6336 | 6776 | 7291 | 7761 |
| 1224 | 1771 | 2228 | 2822 | 3352 | 3839 | 4407 | 4830 | 5388 | 5750 | 6341 | 6793 | 7298 | 7774 |
| 1273 | 1794 | 2238 | 2827 | 3362 | 3840 | 4409 | 4837 | 5397 | 5753 | 6367 | 6799 | 7319 | 7775 |
| 1301 | 1802 | 2268 | 2828 | 3367 | 3847 | 4418 | 4843 | 5408 | 5777 | 6430 | 6825 | 7340 | 7791 |
| 1314 | 1823 | 2274 | 2829 | 3372 | 3853 | 4419 | 4845 | 5410 | 5788 | 6432 | 6831 | 7359 | 7805 |
| 1342 | 1832 | 2278 | 2839 | 3378 | 3867 | 4435 | 4874 | 5413 | 5790 | 6445 | 6850 | 7370 | 7808 |
| 1361 | 1840 | 2280 | 2872 | 3384 | 3874 | 4442 | 4879 | 5434 | 5805 | 6451 | 6869 | 7371 | 7814 |
| 1402 | 1851 | 2285 | 2882 | 3385 | 3878 | 4446 | 4890 | 5435 | 5806 | 6453 | 6879 | 7385 | 7837 |
| 1405 | 1891 | 2303 | 2884 | 3393 | 3892 | 4447 | 4894 | 5446 | 5835 | 6466 | 6882 | 7386 | 7845 |
| 1417 | 1900 | 2312 | 2888 | 3418 | 3919 | 4448 | 4943 | 5447 | 5838 | 6481 | 6885 | 7392 | 7877 |
| 1419 | 1910 | 2321 | 2902 | 3439 | 3930 | 4449 | 4944 | 5482 | 5852 | 6508 | 6892 | 7394 | 7881 |
| 1421 | 1911 | 2343 | 2915 | 3446 | 3935 | 4450 | 4948 | 5499 | 5853 | 6536 | 6921 | 7400 | 7903 |
| 1428 | 1912 | 2357 | 2921 | 3457 | 3960 | 4454 | 4969 | 5502 | 5855 | 6540 | 6942 | 7447 | 7965 |
| 1438 | 1915 | 2360 | 2926 | 3477 | 3984 | 4457 | 4970 | 5519 | 5864 | 6544 | 6945 | 7487 | 7982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 22/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **MG-09 : 3173**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/-: 1739 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर), 3446 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 5553, 6938, 7813

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0782 | 0987 | 2818 | 3858 | 4668 | 4973 | 6164 | 8050 | 8092 | 9694 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1437 | 1950 | 2228 | 3734 | 4613 | 6022 | 7149 | 8217 | 8649 | 9461 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0015 | 1026 | 1951 | 2823 | 3871 | 5116 | 6244 | 7341 | 7987 | 8848 |
| 0029 | 1051 | 1970 | 2882 | 4207 | 5156 | 6260 | 7354 | 8003 | 9034 |
| 0047 | 1116 | 2002 | 2962 | 4255 | 5170 | 6381 | 7429 | 8101 | 9073 |
| 0065 | 1135 | 2229 | 3033 | 4268 | 5180 | 6546 | 7459 | 8185 | 9095 |
| 0072 | 1139 | 2275 | 3037 | 4344 | 5194 | 6629 | 7475 | 8188 | 9100 |
| 0092 | 1317 | 2322 | 3069 | 4387 | 5303 | 6633 | 7524 | 8348 | 9119 |
| 0179 | 1352 | 2463 | 3113 | 4457 | 5340 | 6751 | 7537 | 8368 | 9215 |
| 0274 | 1566 | 2523 | 3289 | 4476 | 5365 | 6865 | 7671 | 8382 | 9229 |
| 0522 | 1574 | 2526 | 3362 | 4514 | 5498 | 6885 | 7742 | 8383 | 9305 |
| 0560 | 1603 | 2544 | 3394 | 4516 | 5524 | 7082 | 7770 | 8572 | 9318 |
| 0570 | 1612 | 2609 | 3427 | 4633 | 5577 | 7097 | 7778 | 8707 | 9321 |
| 0715 | 1682 | 2623 | 3612 | 4843 | 5817 | 7137 | 7828 | 8814 | 9596 |
| 0736 | 1903 | 2624 | 3771 | 4844 | 5831 | 7176 | 7856 | 8815 | 9899 |
| 0872 | 1922 | 2806 | 3783 | 4945 | 5893 | 7282 | 7940 | 8823 | 9956 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री

• राजलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 34 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 22/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- **SR-01 : 5018**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1641 | 1725 | 2252 | 2297 | 3385 | 4094 | 4459 | 4728 | 5699 | 5910 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1544 | 1642 | 1911 | 2607 | 3125 | 3824 | 3845 | 4769 | 4903 | 5649 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1109 | 1797 | 2312 | 3161 | 4847 |
| 1146 | 1809 | 2482 | 3218 | 4884 |
| 1268 | 1819 | 2669 | 3282 | 5139 |
| 1421 | 1841 | 2715 | 3289 | 5250 |
| 1439 | 1888 | 2817 | 3373 | 5308 |
| 1478 | 1894 | 2890 | 3549 | 5365 |
| 1680 | 1901 | 2972 | 3930 | 5395 |
| 1701 | 2032 | 3004 | 4029 | 5496 |
| 1707 | 2138 | 3038 | 4145 | 5534 |
| 1715 | 2208 | 3073 | 4146 | 5543 |
| 1716 | 2273 | 3087 | 4377 | 5645 |
| 1717 | 2299 | 3154 | 4521 | 5989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. २३/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | ० | ५ |
| ३२ | ०४ | ५४ |
| ३७ | ०९ | ५९ |
| १२० | १४५ | १६८ |
| ५८० | १२७ | १४० |


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# गोव्यात तिसरी ते आठवीची समान सामायिक परीक्षा होणार

■ पणजी




**राष्ट्रीय** शिक्षण धोरणाची कार्यवाही सुरू झाल्यानंतर आता गोवा राज्यात तिसरी ते आठवीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांची सामायिक परीक्षा होणार आहेत. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका जीएससीईआरटी अर्थात गोवा राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण मंडळ काढणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच वेळी होईल. परीक्षेचे वेळापत्रक जीएससीईआरटीने जारी केले आहे. त्याचप्रमाणे ही परीक्षा नियमानुसार होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी जीएससीईआरटीचे फिरते पथक अचानक भेट देऊन पाहणी करणार आहे.

मंडळाने या सामायिक परीक्षेबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. यामध्ये तिसरी आणि चौथीची सामायिक परीक्षा ९ ऑक्टोबरपासून तर पाचवी ते आठवीपर्यंतची परीक्षा ७ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक आणि नियमही निश्चित केले आहेत. त्यानुसारच परीक्षा घेतल्या जातील.

परीक्षा घेताना शाळांवर काही जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थी आजारी असल्यास किंवा इतर कारणांमुळे त्याला परीक्षेस बसणे शक्य झाले नाही, तर त्याच्यासाठी पुन्हा परीक्षा घेण्याची जबाबदारी शाळांची असेल. तिसरी आणि सहावीसाठी कौशल्य-आधारित विषयांची परीक्षा होणार नाही. पाचवीच्या संस्कृत विषयाचा पेपर शाळांना काढावा लागेल. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पेपर लिहिण्याची वेगळी व्यवस्था करावी लागेल.

# संसदेच्या भिंतीवरून उडी पहाटे घुसखोरीचा प्रयत्न

■ नवी दिल्ली

**आरोपी अटक**

**देशातील** सर्वाधिक सुरक्षित मानल्या जाणाऱ्या संसद भवनात आज पहाटे साडेसहा वाजताच्या सुमारास एका व्यक्तीने भिंतीवरून उडी घेत घुसखोरीचा प्रयत्न केला. या व्यक्तीला अटक करून त्याच्यावर कारवाई केली.

पहाटे रेल भवनाजवळील झाडाचा आधार घेत त्याने संसद भवनाच्या भिंतीवरून चढून आत घुसला. नवीन संसद भवनाच्या गरुड द्वारापर्यंत पोहोचला. सुरक्षा रक्षकांनी तत्काळ कारवाई करून त्याला ताब्यात घेतले.

# उत्तर प्रदेशात आज शाळांमध्ये अवकाश दिन साजरा करणार

**एनसीआरटीईचा उपक्रम**

■ लखनौ

**मुलांच्या** मनात कुतुहल निर्माण करण्यासाठी उत्तर प्रदेशातील शाळांमध्ये अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल आज दुसरा राष्ट्रीय अवकाश दिन साजरा केला जाणार आहे. यामध्ये सर्व सरकारी प्राथमिक, माध्यमिक, उच्च-माध्यमिक शाळांसोबतच कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांमध्ये हा उपक्रम होईल.

या दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात एनसीआरटीईकडूनही भारत एक उदयोन्मुख अवकाश सत्ता या विषयावरील एक अभ्यास संदर्भ पुस्तिकाही प्रसिद्ध केली जाणार आहे. एनसीईआरटीच्या अधिकृत संकेतस्थळावर ही पुस्तिका उपलब्ध असेल. ही पुस्तिका विद्यार्थ्यांचे वय आणि इयत्ता यांचा विचार करून तयार करण्यात येणार आहे. यामध्ये चांद्रयान, आदित्य-एल१ आणि गगनयान यासारख्या भारतीय अवकाश मोहिमेच्या यशोगाथांचा समावेश आहे. उत्तर प्रदेश शालेय शिक्षण विभागाच्या महासंचालक कांचन वर्मा यांनी सांगितले की, या उपक्रमासाठीचे अभ्यास साहित्य सध्या वेगवेगळ्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. दीक्षा, निष्ठा, एनसीईआरटी संकेतस्थळ यासारख्या ठिकाणी यासंदर्भातील नियमित अपडेट्स उपलब्ध करून दिले जातात.

## देश विदेश

# दंगलीशी संबंधित प्रकरणांत इम्रान खानला जामीन मंजूर

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानचे** माजी पंतप्रधान इम्रान खानला मे २०२३ रोजी झालेल्या दंगलींशी संबंधित आठ प्रकरणांत पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला.

मुख्य न्यायाधीश याह्या आफ्रिदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाच्या या निर्णयानंतरही, इम्रान खान यांची तुरुंगातून सुटका होणार नाही. कारण त्यांच्याविरुद्ध इतर अनेक खटले प्रलंबित आहेत. ते ५० अब्ज पाकिस्तानी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात १४ वर्षांची शिक्षा भोगत आहे. अल-कादिर ट्रस्ट भ्रष्टाचार प्रकरणात इम्रान खान यांना अटक झाल्यानंतर ९ मे २०२३ रोजी पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात दंगली झाल्या होत्या.

# टेक्सासच्या वॉन्टेड महिलेला एफबीआयने भारतात पकडले



■ वॉशिंग्टन

**अमेरिकन** तपास संस्था एफबीआयने भारतातून टेक्सासमधील मोस्ट वॉन्टेड फरार महिला सिंडी रॉड्रिग सिंग हिला अटक केली आहे. तिच्यावर स्वतःच्या सहा वर्षांच्या मुलाचा, नोएल रॉड्रिग्जचा खून केल्याचा आरोप आहे.

फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनचे (एफबीआय) संचालक काश पटेल यांनी सांगितले की, भारतीय अधिकारी आणि इंटरपोलच्या मदतीने २० ऑगस्ट २०२५ रोजी सिंडीला भारतात पकडण्यात आले. तिला अमेरिकेत परत पाठवून टेक्सास अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सिंडीचा जन्म १९८५ मध्ये डल्लास (टेक्सास) येथे झाला असून, तिचे भारत व मेक्सिकोशीही संबंध आहेत. ती एफबीआयच्या पहिल्या १० वॉन्टेड आरोपींच्या यादीत होती. तिच्या अटकेसाठी २.५० लाख डॉलर्स (सुमारे २ कोटी रुपये) इतके बक्षीस जाहीर करण्यात आले होते. गेल्या सात महिन्यांत अटक झालेली ती चौथी फरार आरोपी आहे. सिंडीने खोटे सांगितले होते की, नोएल आपल्या वडिलांसोबत मेक्सिकोमध्ये आहे. परंतु नोव्हेंबर २०२२ नंतर तो कोणासोबतही दिसला नाही. यानंतर ती तिचा पती अर्शदीप आणि सहा मुलांसह भारतात आली होती. मात्र नोएल त्या विमानात नव्हता. नोव्हेंबर २०२३ मध्ये तिच्याविरोधात वॉरंट काढण्यात आले होते, तर जुलै २०२५ मध्ये तिचे नाव मोस्ट वॉन्टेड यादीत समाविष्ट झाले.

# ऑस्ट्रेलियात स्थलांतरविरोधी फलकावरून खासदार नाराज

■ मेलबर्न

**वन** नेशन पक्षाच्या व्हिक्टोरियामधील एकमेव खासदार रिकी-ली टायरल यांनी त्यांच्या मतदारसंघात लावलेल्या स्थलांतरविरोधी फलकावरील मजकुराला विरोध केला आहे. त्यांनी हा मजकूर त्यांच्या मतदारसंघासाठी अयोग्य असल्याचे म्हटले आहे. डिसेंबर २०२४ पासून, वन नेशन पक्षाने मिलदुरा, स्टावेल आणि बेरन्सडेल येथे भाडेवाढीला स्थलांतर जबाबदार असल्याचे फलक लावले आहेत. या फलकांमुळे वाद निर्माण झाला आहे.

खासदार टायरल म्हणाल्या की, मला

**सरकारच्या पक्षांतर्गत मतभेद**

फलक लावला जाणार हे माहीत होते. परंतु त्यावरील मजकूर काय असेल हे मला माहीत नव्हते. या फलकांशी माझा संबंध नाही. हे फलक फेडरल प्रचाराचा भाग होते. माझ्या मतदारसंघाची अर्थव्यवस्था स्थलांतरित मजुरांवरच अवलंबून असल्यामुळे आहे. मुख्यमंत्री जेसिंटा ॲलन यांनी वन नेशनच्या भूमिकेवर टीका करत, ग्रामीण भागात अशा द्वेषपूर्ण प्रचाराला स्थान नसल्याचे म्हटले आहे. तर संबंधित जाहिरात कंपनीने स्पष्ट केले की, मिलदुरा व बेरन्सडेल येथील फलक काढले आहेत. स्टावेलमधील फलक लवकरच हटवण्यात येणार आहे. वन नेशनच्या फेडरल शाखेने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

# बैलपोळा सणानिमित्त साईबाबांना सोन्याचे कडे

■ नाशिक

**राज्यासह** शिर्डीतील साईमंदिरात आज पारंपरिक पद्धतीने बैलपोळा सण साजरा करण्यात आला. आज श्री साईबाबांच्या समाधीवर बैलाच्या मूर्ती ठेवून त्यांना गोड नैवेद्य दाखवून आरतीही करण्यात आली. बाबांच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी समाधीवर सर्जा-राजाचेही दर्शन घेतले. हा सण उत्साहात साजरा होत असताना कर्नाटक येथून आलेल्या साईभक्त व्यंकप्पा घोडके यांनी ५६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कडे साईंचरणी अर्पण केले. या सुवर्णकड्यावर अतिशय सुंदर आणि बारीक नक्षीकाम केले असून त्याला गुलाबी रंगाचे हिरे लावण्यात आले आहेत. या कड्याची किंमत जवळपास ५ लाख रूपये आहे.

# हमी देऊनही स्कायवॉक अपूर्ण! हायकोर्ट संतापले

■ मुंबई

**वांद्रे** रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील परिसरात स्कायवॉकचे बांधकाम पूर्ण करण्यात अपयशी ठरलेल्या महापालिकेला उच्च न्यायालयाने चांगलेच धारेवर धरले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने १० महिन्यांत नव्याने स्कायवॉक बांधण्याची तुम्हीच न्यायालयाला दिलेल्या हमीचे काय झाले? स्कावॉकचे बांधकाम अद्याप पूर्ण का झाले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित करत प्रशासनावर अवमान कारवाई का करू नये, अशी विचारणा करून विलंबाबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश पालिका प्रशासनाला दिले.



वांद्रे रेल्वे स्थानकाच्या पूर्व परिसरात स्कायवॉक नसल्यामुळे म्हाडा, एसआरए आदी सरकारी कार्यालयांमध्ये जाणाऱ्या नागरिकांना एकमेव अरुंद फुटपाथवरून चालावे लागत आहे. अशा स्थितीत नागरिकांच्या जीवाला अपघाताचा धोका आहे, असा दावा करीत उच्च न्यायालयाचे माजी कर्मचारी ॲड. के. पी. पी. नायर यांनी मार्च २०२ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. खंडपाठाने या याचिकेची गंभीर दखल घेतली होती. त्यावेळी पालिकेने पंधरा महिन्यात स्कायवॉक पूर्ण करण्याची हमी दिली होती. मात्र या हमीची पूर्तता करण्यास पालिकेला अपयश आल्याने खंडपिठाने पालिकेच्या कारभाराचे धिंडवडे काढले होते. त्यावेळी पालिकेने स्कायवॉकचे काम सुरू झाले असून पंधरा महिन्यात पूर्ण केले जाईल, अशी हमी दिली. नंतर खंडपीठाने दहा महिन्यांत स्कायवॉक पूर्ण करा, असे आदेश देत याचिका मार्च २४ मध्ये निकाली काढली. मात्र न्यायालयाच्या आदेशानंतरही एक वर्षाचा कालावधी उलटूनही स्कायवॉकचे काम अपूर्ण आहे. असल्याने ,ॲड. के. पी. पी. नायर यांनी उच्च न्यायालयात धाव घेत अवमान याचिका दाखल केली.

# बारमध्ये संगीताआड अश्लील नृत्य

■ नागपूर

**उपराजधानी** नागपूर शहरात सुगम संगीत परवान्याच्या आड अवैध डान्सबार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. नागपूर गुन्हे शाखेच्या पथकाने कळमना पोलिसांच्या हद्दीत मध्यरात्री छापा टाकत एका बारवर कारवाई केली. याप्रकरणी २५ जणांवर गुन्हा नोंद झाल्याची माहिती आहे. यामध्ये बार मालक, त्यांचा मुलगा आणि व्यवस्थापक यांच्यासह २२ ग्राहकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जुना कामठी रोडवरील उड्डाणपुलाखालील बारमध्ये सुगम संगीत या परवान्याच्या नावाखाली हा अवैध व्यवसाय सुरू होता. याठिकाणी ३ महिलांकडून अश्लील नृत्य करून घेतले जात असल्याचे आढळले. तर बारमधील ग्राहक नोटांची उधळण करत होते.पोलिसांनी कारवाईदरम्यान ४६ हजार रुपये रोख रक्कम, ३ दुचाकी, २ चारचाकी, २४ मोबाईल फोन आणि वाद्यसामग्री असा मुद्देमाल जप्त केला. ३ तरुणींची सुटका केली. हा बार तात्पुरता सील करून त्याच्यावर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे.

# गुरुदास कामत यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली



देशाचे माजी केंद्रीय राज्यमंत्री गुरुदास कामत यांच्या सातव्या पुण्यतिथीनिमित्त अंधेरी पश्चिम येथील बॉम्बे ग्रॅज्युएट फोरमच्या डीएन नगर कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गुरुदास कामत यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे माजी कोषाध्यक्ष डॉ. अमरजीतसिंह मनहास, माजी आमदार अशोक जाधव, अनिल गलगली, राजेश शर्मा, महेश मलिक, क्लाईव डायस, अभिलाष अवस्थी, ॲड. अवनीश सिंह, ॲड. धर्मेश व्यास, शिवाजी सिंह, भावना जैन, वजीर चांद मुल्ला, गफूर खान, संतोष गुप्ता आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुंबईला वर्षभर पुरेसे पाणी

■ मुंबई

**गेल्या** काही दिवसांपासून मुंबईसह राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही दमदार पाऊस कोसळल्याने सातही धरणांचा पाणीसाठा ९५.१३ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत हा पाणीसाठा ९४.४९ टक्के इतका होता. सध्या सात धरणांपैकी चार धरणे काठोकाठ भरल्यामुळे मुंबईकरांची वर्षभराची पाणी चिंता मिटली आहे.

मुंबईला ऊर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, भातसा, विहार आणि तुळशी या सात धरणांमधून दरदिवशी ३९०० दशलक्ष लीटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. या सातही धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता १४ लाख ४७ हजार ३६३

**तलावांमध्ये ९५ टक्के साठा**

दशलक्ष लीटर इतकी असून, आता धरणांमध्ये १३ लाख ७६ हजार ७०३ दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या अनेक दिवसांपासून धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतली होती.

# गणेशोत्सवात पुणे मेट्रो रात्री २ वाजेपर्यंत धावणार

पुणे- गणेशोत्सव काळात पुणेकरांना मेट्रो अधिक वेळ उपलब्ध होणार आहे. ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान मेट्रो सकाळी ६ ते रात्री २ वाजेपर्यंत म्हणजेच २० तास धावणार आहे. तर विसर्जनाच्या दिवशी, ६ सप्टेंबरला मेट्रो २४ तास सुरू राहील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. गणेशोत्सवाची तयारी पाहण्यासाठी अजित पवार यांनी पुण्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त, पोलीस आयुक्तांसह आढावा बैठक घेतली. मध्यवर्ती पेठांच्या परिसरात वाहतूककोंडी होत असल्याने प्रवाशांना सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मेट्रो वेळेत बदल करून सेवा मध्यरात्रीपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.




# अजित पवार गटातून वाळू तस्कराची हकालपट्टी

**पुणे** - यवतमाळ येथील वाळूमाफिया सगीर अन्सारी याची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून (अजित पवार गट) हकालपट्टी करण्यात आली आहे. सगीर अन्सारीचा राष्ट्रवादीत प्रवेश झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई करण्यात आली. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माहिती दिली. आज ते मेट्रोच्या कामाची पाहणी कारण्यासाठी पुणे दौऱ्यावर आले असता, त्यांना सगीर यांच्याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी पक्षातून हकालपट्टी केल्याचे स्पष्ट केले.

# गणेशोत्सवात आणखी एक दिवस स्पीकरला परवानगी द्यावी

■ मुंबई

**गणेशोत्सव समन्वयक समितीची मागणी**

**यंदाच्या** गणेशोत्सवात एकूण चार दिवस रात्री १२ वाजेपर्यंत स्पीकरचा म्हणजेच ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली आहे. गणेशोत्सवातील दुसरा, पाचवा, गौरी विसर्जन आणि अनंत चतुर्दशी या दिवशीही परवानगी देण्यात आली आहे. यात आणखी एक दिवस वाढवून द्यावा, अशी मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वयक समितीने राज्य सरकारकडे केली आहे. दीड दिवसाच्या गणेश विसर्जनासाठी २८ ऑगस्ट, पाच दिवसांच्या गणेश विसर्जनासाठी १ सप्टेंबर, गौरी विसर्जनासाठी २ सप्टेंबर आणि अनंत चतुर्दशीसाठी ६ सप्टेंबर असे चार दिवस रात्री उशिरापर्यंत ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने प्रत्येक राज्याला १५ दिवसांसाठी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक लावण्याची परवानगी दिली आहे.

# बारमधील छाप्यात अटक केलेल्या चौघांना मुंबई उच्च न्यायालयाचा दिलासा

■ मुंबई

**पनवेल** येथील बारमध्ये अश्लील कृत्य केल्याचा आरोप असलेल्या चौघांना उच्च न्यायालयाने फौजदारी कारवाई रद्द करून मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने तुषार रांका, दर्शित सोनी, अमित रांका आणि विकास शाह या चौघांविरोधातील कारवाई रद्द केली. पोलिसांनी बारवर छापा टाकला, त्यावेळी हे चौघेही तिथे उपस्थित होते.

तथापि, ते कोणतेही अश्लील कृत्य, अश्लील गाणे वा तत्सम शब्द उच्चारत होते, असा कोणताही आरोप एफआयआरमध्ये नाही, असे खंडपीठाने स्पष्ट करत कारवाई रद्द केली. १ जुलै २०२३ रोजी पनवेल तालुका पोलिसांनी साई पॅलेस येथील एका बीअर बारवर छापा टाकला. तिथे ताब्यात घेतलेल्या लोकांविरोधात पोलिसांनी भादंवि कलम २९४, १८८, ३४, तसेच अश्लील नृत्य प्रतिबंधक कायदा आणि महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यावर याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सना रईस यांनी तीव्र आक्षेप घेतला. फौजदारी कायदा निष्पाप प्रेक्षकांना त्रास देण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही. चारही याचिकाकर्ते बारमध्ये फक्त ग्राहक म्हणून उपस्थित होते. त्यांनी अश्लील कृत्यात सहभाग घेतल्याचे सिद्ध करणारा एकही पुरावा नाही. कोणत्याही पुराव्याशिवाय त्यांना खोट्या खटल्यात ओढण्यात आले आहे.

# गिरगावच्या इस्कॉन मंदिराला तिसऱ्यांदा धमकीचा ई-मेल

■ मुंबई

**मुंबईच्या** गिरगाव परिसरातील प्रसिद्ध इस्कॉन मंदिराला आज सकाळी बॉम्बने उडवण्याची धमकीचा ई-मेल आला. मंदिराला अशी धमकी तिसऱ्यांदा मिळाली आहे. या धमकीनंतर मंदिरात बॉम्ब शोध पथक आणि श्वान पथकांद्वारे तपासणी करण्यात आली. पण कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. मंदिराच्या अधिकृत ई-मेलवर इमानुएल सेक्रन या नावाच्या आयडीवरून हा मेल पाठवण्यात आला होता. याच आयडीवरून जुलै महिन्यातही धमकीदेण्यात आली होती. या प्रकरणात गावदेवी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मध्य रेल्वे**

**खुली ई-बोली सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून वेबसाईट www.ireps.gov.in द्वारे खुल्या ई-बोली आमंत्रित करीत आहेत. **निविदा सूचना क्र.: बीबी.एलजी.डब्ल्यू. एलटीटी.२०२५.०७, दिनांक १९.०८.२०२५. कामाचे नावः** मेल/एक्सप्रेस ट्रेन्सच्या एलएचबी एसी कोचेस, पॉवर कार आणि पॅन्ट्री कार्सच्या एसबीसी पॅनलमध्ये विद्यमान के-४४ एल ॲण्ड टी बनावटीच्या (मॉडेल क्र. एमसीएक्स-२३) कॉन्टॅक्टर ऐवजी नवीन के-४४ एबीबी बनावटीच्या (मॉडेल क्र. एएफ११६बी-४०) कॉन्टॅक्टरचा पुरवठा आणि बदलणे. **कामाचे अंदाजित मूल्यः** रु. ४७,३३,७४४.६४. **ईएमडीः** रु. ९४,७००/-. **वैधताः** ६० दिवस, **पूर्तता कालावधीः** ६ महिने. **निविदा बंद होण्याचा दिनांकः** १०.०९.२०२५ रोजी १५.०० वा. **बोलीदारांना सूचनाः १. बंद होण्याच्या दिनांकानंतर निविदा उघडण्यात येईल.** २. संभाव्य बोलीदारांना निविदा आणि शुद्धीपत्रक, जर असल्यास, च्या अधिक तपशिलांकरिता आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** ला भेट देण्याची विनंती आहे. ३. बोलीदार वरील ई-निविदेमध्ये फक्त आमच्या वेबसाईट द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होता येईल. ई-निविदेकरिता व्यक्तिशः प्रस्ताव सादर करता येणार नाहीत. व्यक्तिशः, जर सादरीकरण केल्यास ते उघडण्यात येणार नाहीत किंवा विचारातही घेण्यात येणार नाही. ४. अधिक चौकशीकरिता वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (कोचिंग), विस्तारित इमारत, १ला मजला, मध्य रेल्वे, सीएसएमटी मुंबई यांना संपर्क करावा. ५. सदर बोली रेल्वे मंडळ पत्र क्र. २०१५/आरएस(जी)/७७९/५ दिनांक ०३.०८.२०१७ आणि २७.१२.२०१७ नुसार वितरित औद्योगिक प्रोत्साहन आणि धोरण विभाग, वाणिज्य मंत्रालयाद्वारे पारित सार्वजनिक प्रापण धोरण (मेक इन इंडिया) आदेश २०१७, दिनांक १५.०६.२०२७ चे पालन करते. APEX-390

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**मध्य रेल्वे**

**ओएचई सुधारणा काम**

उप मुख्य विद्युत अभियंता (बांध.) दादर, टिळक ब्रिजजवळ, पश्चिम रेल्वेच्या प्लॅटफॉर्म क्र. ५ समोर, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८ हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामाकरिता नामांकित कंत्राटदारांकडून वेबसाईटद्वारे ऑनलाईन खुल्या निविदा आमंत्रित करीत आहेत. **खुली निविदा सूचना क्र.: एलसीएफ/डीआर/ओएचई/४९३/२०२५/१२, दिनांक २०.०८.२०२५. कामाचे नावः** सेंट्रल रेल्वेच्या मुंबई विभागामध्ये आसनगाव-कल्याण पासून १५ डब्यांच्या गाड्यांकरिता कसारा यार्ड विस्तार आणि प्लॅटफॉर्म विस्ताराच्या संबंधात २५केव्ही एसी ओएचईचे आरेखन, सामग्रीचा पुरवठा, उल्लंघन हटवणे, सुधारणा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन. **अंदाजित मूल्यः** कामाचे एकूण मूल्य रु. ९,२०,६१,२२४/- (रुपये नऊ कोटी वीस लाख एकसष्ट हजार दोनशे चोवीस मात्र). **इसारा रक्कमः** रु. ६,१०,३००/- (रुपये सहा लाख दहा हजार तीनशे मात्र) किंवा वेबसाईट **www.ireps.gov.in** द्वारे मार्गदर्शनानुसार. **पूर्तता कालावधीः** १८(अठरा) महिने पावसाळा समाविष्ट **निविदा अर्जाची किंमतः** शुन्य, **प्रस्तावाची वैधताः** ६० (साठ) दिवस. **वेबसाईटः** निविदा सूचना आणि निविदा दस्तऐवज वेबसाईट **www.ireps.gov.in** मधून प्राप्त करता येतील. **सादर करण्याचा दिनांक आणि वेळः** दि. ११.०९.२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळः** दि. ११.०९.२०२५ रोजी १५.०० वाजेनंतर. **टीपः** संभाव्य निविदाकारांनी त्यांचे प्रस्ताव इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करण्यापूर्वी, त्यांनी अटी आणि शर्ती, पात्रता निकष, ईएमडीचे मूल्य सादर करण्याची पद्धत आणि निविदा दस्तऐवज इ. संबंधी निविदेच्या तपशिलाकरिता सीआरआयएस वेबसाईट **www.ireps.gov.in** पहावी. APEX-389

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**मध्य रेल्वे**

**दुरूस्ती आणि देखभाल कामे**

**खुली ई-निविदा सूचना क्र. सीआर-डीआरएम(डब्ल्यू)बीबी-२०२५-२५ दि. १८.०८.२०२५**

**अ. क्र. १. कामाचे नावः** एमएलएनडीः मुलुंड कॉलनी येथे इमारत क्र. आरबी-II/३४ च्या दरवाजे, खिडक्या, प्रसाधनगृहे, स्नानगृहे, स्वयंपाकघर आणि प्लास्टरची दुरूस्ती. अदमासे मूल्य रु. १९९.८५ लाख, ईएमडी रु. २४९९००, पूर्तता कालावधी - १२ महिने.

**अ. क्र. २. कामाचे नावः** (अ) भायखळा - एसएसई(कामे)भायखळा अंतर्गत झोन ऐवजी स्टेशन क्षेत्र, प्लॅटफॉर्म्स आणि सेवा इमारतींची विविध वार्षिक देखभाल काम (ब) परेल - एसएसई(कामे) परेल अंतर्गत झोनल कामांऐवजी क्वार्टर्सचे विविध वार्षिक देखभाल काम. अदमासे मूल्यः रु. १६७.९२ लाख, ईएमडीः रु. २३४०००, पूर्तता कालावधीः १२ महिने.

**अ. क्र. ३. कामाचे नावः** अ) दादर - एसएसई(कामे)दादर अंतर्गत झोन ऐवजी स्टेशन क्षेत्र, प्लॅटफॉर्म्स आणि सेवा इमारतींची विविध वार्षिक देखभाल काम. ब) दादर - एडीईएन(डब्ल्यू) भायखळा अंतर्गत दादर येथील विद्यमान ईटीएल आणि सीॲण्डडब्ल्यू कार्यालयाची दुरुस्ती. अदमासे मूल्यः रु. २९३.६३ लाख, ईएमडीः रु. २९६८००, पूर्तता कालावधीः १२ महिने.

**अ. क्र. ४. कामाचे नावः** अ) वरि. विअभि इस्टेट अंतर्गत केजेआरडी-टीएनए अनुभागामध्ये झिंक प्रायमर, ईपॉक्झी इंटरमिडिएट कोट आणि पोयुरेथन टॉप कोटच्या हाय बिड परफॉर्मन्स कोटींग सिस्टीमसह स्टेशन एफओबींचे (०६ संख्या) रंगकाम. ब) वरि. विअभि इस्टेट सीएसएमटी अंतर्गत दिवा-वसई मार्गावर किमी ४८/०-३ येथे अप्पर कोपर स्टेशन येथे ट्रस, डेक स्लॅब, मुख्य कॉलम्स, जिने आणि फ्लोअर बीम्सची दुरुस्ती समाविष्ट असलेले 'एन' टाईपच्या एफओबीची प्रमुख दुरुस्ती. अदमासे मूल्यः रु. २१४.९३ लाख, ईएमडीः रु. २५७५००, पूर्तता कालावधीः १२ महिने.

**अ. क्र. ५. कामाचे नावः** (अ) सीएसएमटी-कल्याणः डीएनटीएच ते ७ व्या मार्गापर्यंत आकार (२ मि × २ मि) आरसीसी बॉक्स द्वारे कर्नाक बंदरजवळ विद्यमान आरसीसी बॉक्स पू. क्र. ०/५ (१ मि × २ मि)चा विस्तार. (ब) सीएसएमटी-कल्याणः मायक्रोटनलिंग पद्धतीने किमी ८/२००-२५० येथील पू. क्र. ८/१ येथे २ × १.२ मि एनपी-४ आरसीसी पाईपद्वारे अतिरिक्त वॉटरवे. (क) सीएसएमटी-कल्याण विभागामध्ये मायक्रो-टनलिंग पद्धतीने व्हीव्हीएच स्टेशन येथे किमी १७/९००-१८/० येथे २ × १ मि एनपी-४ आरसीसी पाईपची तरतूद. अदमासे मूल्यः रु. १७५५.६१ लाख, ईएमडीः रु. १०२७८००, पूर्तता कालावधीः १० महिने.

I) उपरोल्लेखित निविदेचा निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळः अ. क्र. १, २, ३ आणि ४ दि. ०८.०९.२०२५ रोजी, अ. क्र. ५ दि. ०९.०९.२०२५ रोजी ११.०० वाजेपर्यंत आणि ११.०० वाजेनंतर उघडण्यात येतील.

II) संभाव्य भागधारकांना विनंती आहे की, निविदेचे तपशील आणि शुद्धीपत्रक, जर असल्यास करिता त्यांनी वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी.

III) निविदाकार वरील ई-निविदेमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने फक्त वेबसाईट "www.ireps.gov.in" द्वारेच सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेकरिता व्यक्तिशः प्रस्तावांचे सादरीकरण करता येणार नाही. जर व्यक्तिशः सादरीकरण केल्यास, ते उघडण्यात येणार नाही तसेच विचारातही घेण्यात येणार नाही.

IV) बोली सुरक्षा एकतर ई-पेमेन्ट गेटवेद्वारे रोखीत भरावी किंवा शेड्यूल्ड कमर्शियल बँक ऑफ इंडियाकडून बँक गॅरंटी बॉण्डद्वारे किंवा निविदा दस्तऐवजामध्ये उल्लेखिल्यानुसार भरावी.

V) अधिक चौकशीकरिता, कृपयाः विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मध्य रेल्वे यांना दूरध्वनी ०२२-६७४५५३२३ येथे संपर्क साधावा.

VI) सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७ दिनांक १६.९.२०१७ चे अनुपालन करते. निविदेचे संपूर्ण तपशील वेबसाईट "www.ireps.gov.in" येथे उपलब्ध आहेत. निविदेचे संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मुंबई सीएसएमटी यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहेत. APEX-385

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
|| न मे भक्त प्रणश्यति ||

# एआय तंत्रज्ञान जोखीम आणि संधी

तंत्रज्ञानावर आधारित भविष्यकाळ कसा आहे याबद्दलची परिस्थिती आता कृत्रिम बुद्धिमत्तेवरच अवलंबून आहे. ज्या वेगाने आर्टिफिशियल म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रचार आणि प्रसार सुरू झालेला आहे तो पाहता संपूर्ण जगभरामध्ये या आर्टिफिशियलने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. अन्य विकसित देशांमध्ये या आर्टिफिशियल इंटेलिजन्सने बरीच प्रगती केलेली आहे आणि मोठमोठ्या कामांमध्येसुद्धा या आर्टिफिशलचा वापर करून वेगाने कामे पूर्ण केली जातात. अनेक प्रकारचे निर्णय घेणे, त्या निर्णयांमध्ये सहाय्य करणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यामध्ये सुद्धा या आर्टिफिशिअल इंटिलिजन्सचा मोठा उपयोग होतो आहे. आर्टिफिशल इंटिलिजन्स म्हणजे काय तर मानवी बुद्धीची नक्कल असा त्याचा सरळ अर्थ होतो. ही संपूर्ण प्रणाली संगणकाच्यामार्फत वापरता येते, पण संगणकाच्या माध्यमातून मानवी बुद्धीपेक्षा अधिक वेगाने या प्रक्रियेमध्ये कामे होऊ शकतात. किंबहुना नवनव्या संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्याचे काम देखील यामधून होऊ शकते. हे तंत्रज्ञान आता वेगाने सर्वत्र स्वीकारले जात असल्याने यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ तयार करणे हेच सर्व जगापुढे मोठे आव्हान ठाकले आहे. भारतासारख्या सर्वाधिक मोठी लोकसंख्या असलेल्या देशात सुद्धा हे तंत्रज्ञान प्रचंड वेगाने वापरायला सुरुवात झालेली आहे. आताच्या नव्या आकडेवारीप्रमाणे तर भारतात २०३० पर्यंत किमान दहा लाख एआय तंत्रज्ञांची म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा अभ्यास केलेले किंवा त्यातले तज्ज्ञ अशा पदवीधरांची आवश्यकता भासणार आहे. इतक्या मोठ्या संख्येने हे तज्ज्ञ लागणार आहेत म्हणजेच त्या दिशेने भारतातल्या अनेक विद्यापीठांना अभ्यासक्रमाची सुरुवात करावी लागते आहे. अनेक मोठमोठी विद्यापीठे परदेशी विद्यापीठांशी संधान साधून हे अत्याधुनिक तंत्रज्ञान आपल्या विद्यापीठांमध्ये सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत. यामध्ये सतत होणारे बदल आणि नवनव्या संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्याची जी कार्यपद्धती आहे ती सतत विद्यार्थ्यांना प्रगत करणे आणि आवश्यकतेप्रमाणे तज्ज्ञ निर्माण करणे यासाठी गरजेची ठरते आहे. यासाठी आवश्यक तो आधुनिक पद्धतीचा अभ्यासक्रमही तयार केला जातो आहे. किंबहुना आताच्या परिस्थितीत भारताने या तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम चांगल्या पद्धतीने तयार केला असून, जगाच्या बरोबरीने भारतातूनही आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे विद्यार्थी किंवा स्नातक तयार होतील अशा प्रकारची सिद्धता केलेली आहे.

### दहा लाख तंत्रज्ञांची आवश्यकता

२०२७पर्यंत भारतात चार लाखांपेक्षा जास्त आर्टिफिशिअल इंटिलिन्सचे तज्ज्ञ तयार होतील आणि त्यांच्या माध्यमातून अनेक प्रकारची कामे वेगाने होऊ शकतील. कॉर्पोरेट जगताबरोबरच सरकारच्या ई-गव्हर्नन्समध्येसुद्धा या तंत्राचा वापर होऊ शकतो. एवढेच नव्हे तर आता सामान्य स्तरावर जी कामे माणसाकडून केली जातात त्याच्याऐवजी रोबोटचा वापर केला जाईल आणि या रोबोटला नियंत्रित करण्याचे काम आर्टिफिशियल इंटिलिजन्सच्या माध्यमातून केले जाऊ शकते. म्हणजेच या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे लोक मोठ्या प्रमाणावर बेकार होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अर्थात त्यातले अर्धसत्य असे आहे की, ज्यांना हे तंत्रज्ञान अवगत नाही त्यांना त्यातून बाहेर पडावे लागेल किंवा त्यांना इतर सेवांमध्ये सामावून घ्यावे लागेल. परंतु एक मोठी लाट या तंत्रज्ञानाची येत असल्याने काही जणांवर बेकारीची कुऱ्हाड नक्की कोसळू शकते. जगातल्या मोठमोठ्या कंपन्यांनी आताच हे तंत्रज्ञान माहीत नसलेल्या कर्मचाऱ्यांची कपात करायला सुरुवात केलेली आहे. भारतातही अशा प्रकारचे कामगार कपातीचे धोरण राबवायला काही कंपन्यांनी सुरुवात केली आहे. कारण भविष्यकाळाचा विचार केला तर आता अतिशय वेगाने काम करणाऱ्या या तंत्रज्ञानाशी पारंगत असलेल्या तरुणांची किंवा तज्ज्ञांची आवश्यकता भासणार आहे. ती पूर्ण करण्यासाठी भारताला आज शिक्षण स्तरावर या बदलाची तातडीने दखल घेतली जाते आहे. खासगी विद्यापीठांनी त्यात आघाडी घेतलेली पाहायला मिळते. राज्य सरकारने देखील नव्या मुंबईमध्ये पाच परदेशी विद्यापीठांना एकत्र आणून एक मोठे संकुल तयार केले गेले आहे. त्यामध्ये अशाच प्रकारच्या नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि प्रसार करण्याचा मनोदय प्रयत्न होतो आहे.

### मोठ्या उद्योगांसाठी मोठी संधी

आज संगणकाच्या किंवा मोबाईलच्या अनेक ॲप्सचा उपयोग किंवा ते ॲप्स तयार करण्यासाठी सुद्धा या तंत्रज्ञानाची मदत घेतली जातेय. थोडक्यात या सगळ्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार केला तर पुढच्या दहा-पंधरा वर्षांमध्ये हे तंत्रज्ञान सर्वदूर पोहोचलेले असेल. म्हणजे वीस वर्षांपूर्वी आपण कल्पना केली नव्हती की, डिजिटल तंत्रज्ञान इतक्या वेगाने प्रस्थापित होईल. म्हणजे मोबाईलवरचे ॲप्स आणि डिजिटल क्रांती आपण आज पाहतो आहे. या तंत्रज्ञानाचे फायदे तसे आहेत तसे अनेक धोकेही आहेत. या धोक्यांचा विचार सरकारने आतापासून केला पाहिजे. कारण त्याचा गैरवापर होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर आहे. सायबर क्राईममध्ये या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो. भारत आता या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सज्ज झालेला आहे आणि जगातील इतर देशांपेक्षा वेगाने हे तंत्रज्ञान प्रत्यक्षात आणणारा देश म्हणून स्वतःचे नेतृत्व सिद्ध करतो आहे. मोठ्या संख्येने भारतात हे तंत्रज्ञ तयार होत असतील तर ते भारताची गरज भागवून परदेशात सुद्धा त्यांना मोठा वाव मिळण्याची शक्यता आहे. या तंत्रज्ञानाची लाट उंबरठ्यावर येऊन ठेवलेली आहे आणि त्याच्या योग्य व्यापाराची दक्षता घेणे ही सर्वात मोठी जबाबदारी आणि जोखीमही आहे. काळाचा हा रेटा लक्षात घेऊन भारताच्या विमानसेवा, रेल्वे सेवा मोठमोठ्या महानगराची वाहतूक नियंत्रण सेवा, हवामानाचा अचूक अंदाज व्यक्त करण्यासाठी आणि भारतासारख्या कृषीप्रधान देशातल्या शेती उद्योगाला प्रगत करण्यासाठीसुद्धा आर्टिफिशिअल इंटिलिजन्सची मोठी मदत होऊ लागली आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११


**नकारात्मक विचार केला तर प्रत्येक संधीमध्ये अडचणी दिसतात, पण सकारात्मक विचार केल्यास प्रत्येक अडचणीमध्ये संधी दिसतात.**

**पंचांग**

**शनिवार, २३ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण अमावास्या**

**नक्षत्र : मघा**



**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १८-५९**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ००-१६ कर्क**
**००-१७ ते २४-०० सिंह**

**दर्भाहरण; अश्वत्थ मारूती पूजन; राष्ट्रीय अंतराळ दिवस; अमावास्या समाप्ती सकाळी ११.३५**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या वागळे ईस्टेट विभागीय कार्यालयांतर्गत विविध कार्यालय आणि उपकेंद्रातील साफ सफाईच्या काम करणेसाठी ई- निविदा क्र. EE/WE/E-Tender/T-04/2025-26 महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर दि. २०.०८.२०२५ पासून उपलब्ध आहे.

संपर्क – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, दूरध्वनी क्र. ८८७९०४३०९४, एम.एस.इ.डी.सी.एल., वागळे ईस्टेट विभागीय कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वागळे ईस्टेट, ठाणे(प.) ई-मेल eewagleestate@gmail.com

**कार्यकारी अभियंता, स.व सु. वागळे ईस्टेट विभाग**

**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

Terms of Reference (TOR) for Appointment of Project Management Consultant (PMC) "Maharashtra Climate Resilient Distributed Renewable Energy Access Program" funded by Asian Infrastructure Investment Bank (AIIB).

Tender on e-tendering platform are invited for **"Terms of Reference (TOR) for Appointment of Project Management Consultant (PMC) "Maharashtra Climate Resilient Distributed Renewable Energy Access Program" funded by Asian Infrastructure Investment Bank (AIIB)."**

The details of the Tender are available on MSEDCL's e-tendering Website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

Tender No. **MSEDCL/SPD/MTSKPY/PMC/2025-26/T-02 dated 21.08.2025**

The Important Dates are-

- Date of Availability of Bidding Document on MSEDCL e-tendering Website : 21.08.2025 at 18.00 Hrs
- Pre-Bid Meeting Date & time : 29.08.2025 at 16:00 Hrs
- Last Date & time for submission of Bid : 08.09.2025 at 15:00 Hrs
- Date and time of opening of Technical Bids : 08.09.2025 at 16:00 Hrs
- Date and time of opening of Price Bids : To be notified later.

**Sd/-**
**Chief Engineer (SPD), MSEDCL, Mumbai**

# महिला विश्वचषकाचे स्टेडियम बदलले! बंगळुरूमधील सामने नवी मुंबईत

**मुंबई-** ३० सप्टेंबरपासून भारतात होणाऱ्या आयसीसी क्रिकेट महिला एकदिवसीय विश्वचषकाचे स्टेडियम बदलले. त्यानुसार बंगळुरूमधील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर होणारे सामने नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियममध्ये हलवण्यात आले आहेत. यामध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील उद्घाटन सामना आणि दुसरा उपांत्य सामना यासारखे सामने समाविष्ट आहेत. कर्नाटक सरकारने राज्य क्रिकेट असोसिएशनला सामना आयोजित करण्याची परवानगी दिली नाही. आरसीबीच्या विजय समारंभात झालेल्या चेंगराचेंगरीची चौकशी करणाऱ्या न्यायमूर्ती जॉन मायकल कुन्हा आयोगाने एम चिन्नास्वामी स्टेडियम मोठ्या कार्यक्रमांसाठी योग्य मानले नाही.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परिशिष्ट - १०**
**बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५**
**जाहीर सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्ध करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक | शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात.)<br>स्थळ- कार्यालयांचे ठिकाण यासोबत जोडलेल्या यादीत नमूद आहेत. | शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ ते गुरुवार, दिनांक ०४ सप्टेंबर, २०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

**टिप :** हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन - २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमांबाबत हरकती व सूचना सादर करण्यासाठीची कार्यालये

| अ. क्र. | निवडणूक प्रभाग क्र. | कार्यालय | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | - | उप क. व सं. (निवडणूक) (प्र.) | निवडणूक कार्यालय, ३ रा मजला, मनपा विस्तारीत इमारत, फोर्ट, मुंबई - ४००००१<br>ई-मेल - aetdo.election@mcgm.gov.in |
| २ | १ ते ८ | सहा क. व सं. (आर/उत्तर) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (आर / उत्तर विभाग) यांचे कार्यालय, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह इमारत, ए विंग, ३ रा मजला, चामुंडा सर्कल, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२ दूरध्वनी क्र. ०२२ २८९५९७०७<br>ई-मेल - aacrn.ac@mcgm.gov.in |
| ३ | ९ ते १८ | सहा क. व सं. (आर/मध्य ) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (आर / मध्य विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, २ रा मजला, गोरगांधी हॉटेल जवळ, एफ.पी. ४४, टी. पी. एस. क्र. १, चांदवरकर रोड, स्वामी विवेकानंद रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२. दूरध्वनी क्र. ०२२ २८९० ३९४४<br>ई-मेल - aacrc.ac@mcgm.gov.in |
| ४ | १९ ते ३१ | सहा क. व सं. (आर/दक्षिण) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (आर / दक्षिण विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, खोली क्र. १०९, पहिला मजला, महात्मा गांधी छेद रस्ता क्र. २, सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलावाजवळ, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७. दूरध्वनी क्र. ०२२ २८०५ ५२४६<br>ई-मेल - aacrs.ac@mcgm.gov.in |
| ५ | ३२ ते ३५, ४६ ते ४९ | सहा क. व सं. (पी/उत्तर) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (पी/ उत्तर विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, ९ वा मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४. दूरध्वनी क्र. ०२२ २९९९ ४००० वि.-७९०२<br>ई-मेल - aacpn.ac@mcgm.gov.in |
| ६ | ३६ ते ४५ | अधिक्षक (निवडणूक) पी/पूर्व विभाग | महानगरपालिका पी / पूर्व विभाग कार्यालय, रामलिला मैदान, हिरा बाझार, मालाड (पूर्व), मुंबई - ४०० ०९७<br>ई-मेल - aacpn.ac@mcgm.gov.in |
| ७ | ५० ते ५८ | सहा क. व सं. (पी/दक्षिण) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (पी/ दक्षिण विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, सी.टी.एस. क्र. ७४६, पहाडी व्हिलेज, स्वामी विवेकानंद मार्ग, गोरेगांव (पश्चिम) मुंबई - ४०० १०४. दूरध्वनी क्र. ०२२ २८७२ ००५१<br>ई-मेल - aacps.ac@mcgm.gov.in |
| ८ | ५९ ते ७१ | सहा क. व सं. (के/पश्चिम) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (के / पश्चिम विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, पालीराम मार्ग, स्वामी विवेकानंद मार्ग, अंधेरी स्टेशन समोर, अंधेरी (पश्चिम) मुंबई- ४०००५८. दूरध्वनी क्र. ०२२ २६२४ ९५९४<br>ई-मेल - aackw.ac@mcgm.gov.in |
| ९ | ७२ ते ७९ | अधिक्षक (निवडणूक) के/उत्तर विभाग | महानगरपालिका के / उत्तर विभाग कार्यालय, महानगरपालिका मार्केट इमारत, सीटीएस क्र. १७२/२, १७५ए, पुनम नगर, व्हीलेज - मजास, जोगेश्वरी पूर्व, मुंबई - ४०० ०६०<br>ई-मेल - aacke.ac@mcgm.gov.in |
| १० | ८० ते ८६ | सहा. क.व सं. (के/पूर्व) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (के / पूर्व विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला, खोली क्र. २०६, आझाद रोड, अंधेरी कुर्ला मार्ग, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०००६९, दूरध्वनी क्र. ०२२ २६८४ ३३९२<br>ई-मेल - aacke.ac@mcgm.gov.in |
| ११ | ८७ ते ९६ | सहा क. व सं. (एच/पूर्व) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एच / पूर्व विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, २ रा मजला, प्लॉट क्र. १३७, टी. पी. एस. - ५, रोड नं-२, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ४०००५५ दूरध्वनी क्र. ०२२ २६१७ ३१९८<br>ई-मेल - aacheast.ac@mcgm.gov.in |
| १२ | ९७ ते १०२ | सहा क. व सं. (एच/पश्चिम) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एच/पश्चिम विभाग) यांचे कार्यालय, महानगरपालिका कार्यालय इमारत, चौथा मजला, रु. नं-४०६, दूसरा हसनाबाद लेन, खार रोड (पश्चिम) मुंबई- ४०००५२. दूरध्वनी क्र. ०२२ २६४४ ०१२० वि- ४२५<br>ई-मेल - aachw.ac@mcgm.gov.in |
| १३ | १०३ ते १०८ | सहा क. व सं. (टी) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (टी विभाग) यांचे कार्यालय, खोली क्रं. ७ व ९, तळमजला, लाला देवीदयाल मार्ग, मुलुंड (पश्चिम) मुंबई- ४०००८०. दूरध्वनी क्र. ०२२ २५६४५२९० वि - ३१३<br>ई-मेल - aact.ac@mcgm.gov.in |
| १४ | १०९ ते १२२ | सहा क. व सं. (एस) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एस विभाग) यांचे कार्यालय, ॲमेनिटी बिल्डींग, पहिला मजला, लोढा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, गेट नं ०३, कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०० ०४२. दूरध्वनी क्र. ०२२ २५९४७५१९<br>ई-मेल - aacs.ac@mcgm.gov.in |
| १५ | १२३ ते १३३ | सहा क. व सं. (एन) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एन विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत (नवीन), तिसरा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७७. दूरध्वनी क्र. ०२२ २५०१ १७८१<br>ई-मेल - aacn.ac@mcgm.gov.in |
| १६ | १३४ ते १४८ | सहा क. व सं. (एम/पूर्व) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक ( एम/पूर्व विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, खोली क्र. ३०७, ३०८, तिसरा मजला, स्व. मधुकर तुकाराम कदम मार्ग व पेरीफेरी रोड यांचे जंक्शन, गोवंडी, मुंबई-४०००४३. दूरध्वनी क्र. ०२२ २५५५ ९०४९<br>ई-मेल - aacme.ac@mcgm.gov.in |
| १७ | १४९ ते १५५ | सहा क. व सं. (एम/पश्चिम) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एम/पश्चिम विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, खोली क्र. २, तळ मजला, शरदभाऊ आचार्य मार्ग, नटराज । सिनेमाजवळ, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१. दूरध्वनी क्र. ०२२ २५२८ ०७९५<br>ई-मेल - aacmw.ac@mcgm.gov.in |
| १८ | १५६ ते १७१ | सहा क. व सं. (एल) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एल विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दूसरा मजला, लक्ष्मणराव यादव मार्केट इमारत, एस. जी. बर्वे मार्ग, कुर्ला (प) मुंबई - ४०००७०. दूरध्वनी क्र. ०२२ २६५० ३१८३<br>ई-मेल - aacl. ac@mcgm.gov.in |
| १९ | १७२ ते १८१ | सहा क. व सं. (एफ/उत्तर) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एफ/उत्तर विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, प्लॉट नं. ९६, भाऊ दाजी मार्ग, किंग्स सर्कल, माटुंगा (पूर्व) मुंबई- ४०००१९. दूरध्वनी क्र. ०२२ २४०२ ४३५३<br>ई-मेल - aacfn.ac@mcgm.gov.in |
| २० | १८२ ते १९२ | सहा क. व सं. (जी/उत्तर) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (जी/उत्तर विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, खोली क्र.२७, पहिला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमा जवळ, दादर (पश्चिम) मुंबई- ४०००२८. दूरध्वनी क्र. ०२२ २४३० ८१११<br>ई-मेल - aacgn.ac@mcgm.gov.in |
| २१ | १९३ ते १९९ | सहा क. व सं. (जी/दक्षिण) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (जी/दक्षिण विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, खोली क्र. २२, चौथा मजला, धनमिल नाका. ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००१३. दूरध्वनी क्र. ०२२ २४२२६९०७<br>ई-मेल - aacgs.ac@mcgm.gov.in |
| २२ | २०० ते २०६ | सहा क. व सं. (एफ/दक्षिण) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (एफ/दक्षिण) विभाग, यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, पहिला मजला, खोली क्र. ७/८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड व जगन्नाथ भाटणकर मार्ग यांचे जंक्शन, परळ (पूर्व) मुंबई - ४०००१२. दूरध्वनी क्र. ०२२ २४११४९२५<br>ई-मेल - aacfs.ac@mcgm.gov.in |
| २३ | २०७ ते २१३ | सहा क. व सं. (ई) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (ई विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, पहिला मजला, १० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (पश्चिम) मुंबई- ४००००८, दूरध्वनी क्र. ०२२ २३०९९४१०<br>ई-मेल - aace.ac@mcgm.gov.in |
| २४ | २१४ ते २१९ | सहा क. व सं. (डी) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (डी विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, चौथा मजला जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई - ४००००७. दूरध्वनी क्र. ०२२ २३८६ ५६४३<br>ई-मेल - aacd.ac@mcgm.gov.in |
| २५ | २२० ते २२२ | सहा क. व सं. (सी) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (सी विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, चौथा मजला, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीन लाईन्स, मुंबई - ४००००२. दूरध्वनी क्र. ०२२ २२०८२८१७<br>ई-मेल - aacc.ac@mcgm.gov.in |
| २६ | २२३ ते २२४ | सहा क. व सं. (बी) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (बी विभाग) यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, पहिला मजला, १२१, रामचंद्र भट्ट मार्ग, बाबुला टँक क्रॉस लेन, जे. जे. हॉस्पीटल जवळ, डोंगरी, मुंबई ४००००९. दूरध्वनी क्र. ०२२ २३७९ १५६९<br>ई-मेल - aacb.ac@mcgm.gov.in |
| २७ | २२५ ते २२७ | सहा क. व सं. (ए) विभाग | सहायक करनिर्धारक व संकलक (ए विभाग) यांचे कार्यालय, चौथा मजला, १३४ ई, शहीद भगतसिंग मार्ग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया जवळ, फोर्ट, मुंबई - ४००००१. दूरध्वनी क्र. ०२२ २२६६०३८० <br>ई-मेल - aaca.ac@mcgm.gov.in |

**सही / -** दिनांक २२/०८/२०२५
**(भूषण गगराणी)**
**महानगरपालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

पीआरओ/१३७९/जाहि./२०२५-२६

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**

# आठवणीतले नाटक

## पद्मा चव्हाण यांनी नामदेव अंतुलेचा नामदेव भाटवडेकर का केला?

**मराठी नाटकांच्या प्रवाहात विनोदी, सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक अशी विविध प्रकारची नाटके वेगवेगळ्या काळात रंगमंचावर आलेली पाहायला मिळत असली तरी त्यात भय नाट्यांचं प्रमाण अगदीच अल्प आहे. त्यामुळेच १९८४ मध्ये प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलेलं अशोक समेळ लिखित आणि दिग्दर्शित 'पिंजरा' हे नाटक दर्दी नाट्यरसिकांच्या आठवणीत आजही ताजं आहे. याच नाटकाच्या रंजक आठवणी अशोक समेळ यांनी सांगितल्या.**

नाट्यजत्रा

मकरंद जोशी

मराठी रंगभूमीवर आपल्या अभिनय, लेखन, दिग्दर्शन अशा तिहेरी कामगिरीने नाट्य रसिकांच्या कौतुकाला आणि प्रेमाला पात्र ठरलेले जे मोजके रंगकर्मी आहेत, त्यातले एक ठसठशीत नाव म्हणजे अशोक समेळ. बालनाट्यामधून पन्नास वर्षांपूर्वी रंगभूमीवर पदार्पण करून आज वयाच्या ऐंशीव्या वर्षीही अभिनेता म्हणून कार्यरत असलेल्या अशोक समेळ यांच्या रंगप्रवासातील एक संस्मरणीय नाटक म्हणजे 'पिंजरा'.

तब्बल ४१ वर्षांपूर्वी म्हणजे १९८४ मध्ये व्यावसायिक रंगभूमीवर सादर झालेलं 'पिंजरा' हे भयनाट्य चोखंदळ नाट्यरसिकांच्या स्मरणात आजही ताजं आहे. तेव्हा मराठीत भयनाट्यांची अशी परंपरा नव्हती. त्यात 'पिंजरा' हे नाटक हिचकॉकच्या जगप्रसिद्ध 'सायको'वर आधारित असल्याने जाहिरातीपासूनच प्रेक्षकांची उत्सुकता ताणली गेली होती. शिवाय या नाटकाच्या निमित्ताने दीर्घकाळाने अभिनेत्री पद्मा चव्हाण एका नव्या कोऱ्या नाटकातून प्रेक्षकांसमोर येणार होत्या. साहजिकच पहिल्या प्रयोगापासून 'पिंजरा'ला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

'पिंजरा' हे अशोक समेळ यांचे व्यावसायिक रंगभूमीवर आलेले दुसरे नाटक होते. त्याआधी त्यांनी अनिल बर्वेंच्या कादंबरीवर आधारित 'डोंगर म्हातारा झाला' हे नाटक लिहून रंगमंचावर सादर केले होते. मात्र त्या नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद न लाभल्याने समेळ यांना सुमारे सत्तर हजारांचे कर्ज झाले होते. अशा वेळी प्रेक्षकांना कदाचित भयनाट्य आवडेल म्हणून त्यांनी हिचकॉकच्या 'सायको' चित्रपटावर आधारित 'पिंजरा' हे नाटक लिहिले. आता सायको म्हटल्यावर जरी हिचकॉकचे नाव आठवत असले तरी मुळात ती कादंबरी 'रॉबर्ट ब्लॉच' या लेखकाची होती आणि त्याच्यावर हिचकॉकने सिनेमा काढला होता. ही कादंबरी समेळांनी वाचलेली होती. समेळांनी महाविद्यालयात पदवी घेताना मानसशास्त्र हा विषय घेतलेला असल्याने साहजिकच या कथानकातील नायकाची मनोविकृती आणि त्यातील नाट्य त्यांनी हेरले. परंतु मूळ कथेत नायक आपल्या मृत आईचे शरीर थडग्यातून काढून आणतो आणि ती जणू जिवंत आहे अशा थाटात तिच्याशी संवाद करत, विकृतपणे खून करतो असे आहे. हे आपल्या भारतीय रूपात कसे आणायचे? तर समेळांनी आपला नायक 'नामदेव' हा कोकणी मुसलमान दाखवला. त्यामुळे मग थडग्यातून प्रेत आणणे वगैरे सोपे झाले.

कलाकारांची निवड करताना नामदेवाच्या आईच्या भूमिकेसाठी समेळांच्या डोक्यात पहिल्यापासूनच पद्मा चव्हाण हे नाव होतं. एकतर पद्माबाईंची इमेज ग्लॅमरस होती, मादक सौंदर्याचा ॲटमबॉम्ब अशीच त्यांची ख्याती होती. त्यामुळे या व्यक्तिरेखेसाठी त्या एकदम योग्य होत्या. त्यांनी बऱ्याच वर्षांत नवीन नाटकात काम केले नव्हते. पण त्या नवोदित नाटककाराच्या नाटकात काम करायला तयार होतील का? शिवाय निर्माते अशोक समेळच होते, मग मानधनाचं काय? असे प्रश्न होते. तरी समेळांनी जाऊन पद्माबाईंना नाटक वाचून दाखवलं. त्यांना नाटक आवडल्याने त्यांनी काम करायला होकार दिला. मानधनाबाबतही समेळांनी त्यांना सांगितलं की, तुमच्या अपेक्षेइतके मानधन मी सुरुवातीला देऊ शकणार नाही, पण नाटकाने जोर धरला तर पंचविसाव्या प्रयोगानंतर नक्की देईन.

आणि थरारक भयनाट्य म्हणून 'पिंजरा' रंगभूमीवर आलं. समेळांचे उत्तम नाट्य लेखन आणि अभिनय, पद्मा चव्हाण यांची दमदार भूमिका यामुळे पहिल्या काही प्रयोगातच नाट्यगृहावर हाऊसफुल्लची पाटी झळकली. या नाटकाला रंगमंचावर येण्याच्या आधीच दाद दिली ती ज्येष्ठ दिग्दर्शक-नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी. त्यावेळी ते सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांनी संहिता वाचली आणि समेळांना सांगितलं की, अरे अशोक, या कथानकावर मलाही नाटक लिहायचं होतं, पण मला भारतीय संदर्भात ते आईचं प्रेत कसं आणायचं याचा प्रश्न पडला होता. तू छान युक्ती केली आहेस. आवडेल प्रेक्षकांना हे नाटक.

परंतु नाटककार समेळांच्या याच युक्तीमुळे एक ज्येष्ठ कलाकार मात्र समेळांवर नाराज झाले. ते होते दाजी भाटवडेकर. समेळांनी आपल्या व्यक्तिरेखेचं नाव 'नामदेव इस्माइल अंतुले' असं ठेवलं होतं. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुलेच होते. मुख्यमंत्र्यांचं नाव असं नाटकातल्या विकृत-खुनी व्यक्तिरेखेसाठी वापरल्यामुळे दाजी नाराज झाले आणि म्हणाले, मी एकदा येतोच प्रयोगाला, आणि जर तुम्ही मुख्यमंत्र्यांची बदनामी केली, तर तक्रारच करतो.

त्याप्रमाणे दाजी एका प्रयोगाला आले. समेळांनी दाजींना आलेलं पाहिलं आणि पद्माबाईंना विचारलं की, आज दाजी आहेत, आता काय करायचं? तर त्या म्हणाल्या, काळजी करू नका, मी करते काय करायचं ते.

नाटकाची सुरुवातच पद्माबाई आपल्या मुलाला हाक मारतात, नामदेव इस्माइल अंतुले, किती वाजले? बाहेरचा दिवा कोण लावणार? अशी आहे.



पडदा उघडला, स्पॉट खुर्चीत बसलेल्या पद्माबाईंवर पडला आणि त्यांनी आपला संवाद म्हटला, पण बदल करून, त्या म्हणाल्या, नामदेव इस्माइल भाटवडेकर, किती वाजले?

आता आतमध्ये सगळ्यांना हा बदल कशामुळे झालाय, ते माहिती होतं, त्यामुळे आत एकदम हशा पिकला. प्रेक्षकांत बसलेले दाजी जरा अस्वस्थ झाले. परंतु त्यांना काही बोलता येईना. नंतरच्या सर्व प्रयोगात नामदेवच आडनाव भाटवडेकरच राहिलं.

पण नाव काही झालं तरी 'पिंजरा' लोकप्रिय होणार हे जणू ठरलं होतं. या नाटकाचे महाराष्ट्रातील गावागावांमध्ये मिळून सहाशेच्या वर प्रयोग झाले. पद्मा चव्हाण हे मुख्य आकर्षण होतच. शिवाय समेळांची संहिता, दिग्दर्शन आणि अभिनय याचाही प्रभाव पडला. नाटकाचे तिकिट ७,५, ३ असे होते; त्याकाळात या नाटकाची तिकिटे ब्लॅकमध्ये ५० रुपयांना विकली जात होती. पद्मा बाईंना आपली भूमिका फार आवडली होती. त्यांनी नाटकाच्या जाहिरातीसाठी आपणहून बोल्ड पोझ देऊन फोटो सेशन करण्याची तयारी दाखवली होती, कारण त्यांची व्यक्तिरेखा तशीच होती. परंतु समेळांनी तसे फोटो काढू दिले नाहीत. पिंजरा नाटकाने त्याकाळी उडवलेली खळबळ नाट्य रसिकांच्या आजही स्मरणात आहे. सध्या जुन्या नाटकांचे पुनरुज्जीवन करण्याची लाट आहे, त्यात पिंजराचं पुनरुज्जीवन व्हावं असं अनेक प्रेक्षकांना वाटतं. पण पद्मा चव्हाण यांची भूमिका कोण करणार?

# अजय करणार हॉरर कॉमेडी




सुपरस्टार अजय देवगण आपल्या ॲक्शन चित्रपटांसोबतच कॉमिक टाइमिंगसाठी देखील लोकप्रिय आहे. कथा-भूमिका कुठलीही असो, अजय त्यात समरस होऊन काम करत असतो. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेला त्याचा चित्रपट 'सन ऑफ सरदार २' बॉक्स ऑफिसवर फारसा यशस्वी झाला नाही. आता बातमी समोर येत आहे की, अजय एका हॉरर कॉमेडी चित्रपटामध्ये काम करणार आहे. अद्याप शीर्षक न ठेवलेल्या या सिनेमासाठी अजय सध्या दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील नामवंत दिग्दर्शक जेपी तुमिनाडूसोबत चर्चा करत आहे. नुकताच जेपी तुमिनाडू यांचा कन्नड चित्रपट 'सु फ्रॉम सो' ब्लॉकबस्टर झाला आहे. याच सिनेमावर अजय चित्रपट बनवणार आहे. गोलमाल चित्रपटाच्या अनेक भागांमध्ये अजय कॉमेडी भूमिका करताना दिसला असला तरी त्याच्या लांबलचक चित्रपटांच्या यादीमध्ये संपूर्णपणे हॉरर कॉमेडी असलेला एकही चित्रपट नाही. त्यामुळे 'सु फ्रॉम सो' हा असाच सिनेमा आहे, ज्याची अजय वर्षानुवर्षे वाट बघत होता. कारण अजय नेहमीच विविध लेखक-दिग्दर्शकांची कथानके ऐकायला तयार असतो. जेपी तुमिनाडूनी बनवलेला हा चित्रपट त्याला खूप आवडला आहे. अजयने निर्मात्याला पूर्ण स्क्रिप्ट लिहून झाल्यावर भेटू या, असे सांगितले आहे. त्यामुळे निर्माता-दिग्दर्शकाशी त्याची पुढील महिन्यात पुन्हा भेट होणार आहे.

# ते बघणे खूप दुःखदायक होते



अभिनेत्री भूमी पेडणेकरने आपल्या सहजसुंदर अभिनयाद्वारे हिंदी सिनेसृष्टीमध्ये नाव कमावले आहे. मात्र चित्रपटसृष्टीमध्ये यश, पैसा, प्रसिद्धी मिळवण्यापूर्वी भूमीला आयुष्यात अनेक समस्यांना आणि दुःखांना तोंड द्यावे लागले. एका मुलाखतीदरम्यान भूमीने सांगितले की, ती १८ वर्षांची असताना कॅन्सरमुळे तिच्या वडिलांचे निधन झाले. त्यावेळी तिची लहान बहीण समीक्षा केवळ १५ वर्षांची होती. भूमीने सांगितले की, मी वडिलांना कॅन्सरशी लढताना पाहिले आहे. ते बघणे खूप दुःखदायक होते. ते वडील म्हणून खूप चांगले होते. वडिलांची मला कायम आठवण येत असते. त्या कष्टदायी घटनेच्या वेळी आमच्या आईने आम्हाला धीर दिला होता. भूमीने हे देखील सांगितले की, लहान वयामध्ये आम्हाला अनेक समस्या सहन कराव्या लागल्या. वाईट परिस्थितीतून जावे लागले. वडिलांचे निधन झाल्यानंतर सुरुवातीची दोन वर्षे फार कठीण होती. आज त्या परिस्थितीची आठवण येते तेव्हा वाटते की, आम्ही तो काळ कसा व्यतीत केला. २०१५ मध्ये भूमीने अभिनेता आयुष्मान खुरानासह 'दम लगा के हईशा' या सिनेमाद्वारे अभिनयात पदार्पण केले होते. आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत ३६ वर्षीय भूमीने 'पती, पत्नी और वो', 'टॉयलेट', 'बाला', 'शुभ मंगल सावधान' सारख्या सिनेमांमध्ये काम केले आहे.

# माझ्या मते, प्रेम फिल्मी असते



भारतीय क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा काही दिवसांपूर्वीच घटस्फोट झाला. त्यानंतर दोघेही आपल्या जीवनात पुढे जात आहेत. युजवेंद्र चहल आपली प्रेयसी आरजे महवशसह मजेत आहे, तर घटस्फोटानंतर धनश्रीने आपले सर्व लक्ष आपल्या कामावर केंद्रित केले आहे. नुकत्याच एका मुलाखतीदरम्यान धनश्रीला प्रश्न विचारला गेला की, तू पुन्हा प्रेमाचा शोध घेत आहेस का? यावर धनश्रीने उत्तर दिले की, प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात प्रेमाची गरज असते. कुणाला वाटणार नाही की, आपल्यावर कुणी प्रेम करावे. आपल्या सर्वांची अशीच इच्छा असते. कुठे ना कुठे आपल्याला तशी आशा असते. माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो. कधी कधी प्रेमच अशी एक गोष्ट असते, जी माणसाच्या आयुष्याला शिस्त लावते. मात्र स्वतःवर प्रेम असणे देखील खूप आवश्यक आहे. स्वतःवर प्रेम करा आणि मग प्रेम शोधा. माझ्या मते, प्रेम फिल्मी असते. हृदयात घंटी वाजते, तुमच्यावर फुलं उधळली जातात, असं आपल्याही आयुष्यात व्हावं ही इच्छा चुकीची नाही. भविष्यात माझ्यासाठी काही चांगले लिहिले गेले असेल तर तसे होईलच. माझ्या आई-वडील, मित्र-मैत्रिणी यांची सुद्धा इच्छा आहे की, मला आयुष्यात सुखी व्हावे.

# चिरंजीवी यांचा वर्ल्ड रेकॉर्ड




एखाद्या अभिनेत्याचे चित्रपट सुपरडुपर होत असताना त्याला स्टार किंवा सुपरस्टार असे म्हटले जाते. परंतु त्याही पलिकडे एखाद्या अभिनेत्याला यश मिळाल्यावर त्याला मेगास्टार म्हणू लागतात. दाक्षिणात्य अभिनेता चिरंजीवी यांना म्हणूनच मेगास्टार म्हटले जाते. आपल्या दमदार अभिनयाने त्यांनी दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमध्ये कमालीचे यश मिळवून दबदबा निर्माण केला आहे. जवळपास गेली ५ दशके विविध भूमिका साकार करणाऱ्या या अभिनेत्याला दाक्षिणात्य प्रेक्षक मेगास्टार म्हणतात. त्यांच्या डान्सचे लोक चाहते आहेत. कालच चिरंजीवी यांनी आपला ७० वा वाढदिवस साजरा केला. आपल्या अभिनय कारकिर्दीत चिरंजीवी यांनी यशाचे अनेक रेकॉर्ड बनवले आहेत. परंतु एका रेकॉर्डसाठी त्यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सामील झाले आहे. काय आहे तो रेकॉर्ड ? २०२४ मध्ये चिरंजीवीना त्यांच्या ४५ व्या वर्षाच्या कारकिर्दीदरम्यान १५६ चित्रपटांमध्ये ५३७ गाण्यांवर २४ हजार डान्स स्टेप्स करण्याबद्दल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने सन्मानित केले आहे. त्याचसोबत त्यांच्या अभिनयाची देखील प्रशंसा केली आहे. हैदराबादमध्ये आयोजित केलेल्या एका समारंभामध्ये बॉलीवूड सुपरस्टार आमिर खानने त्यांना हा सन्मान प्रदान केला होता. आज ७० व्या वर्षी सुद्धा चिरंजीवी चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका करत आहेत आणि प्रेक्षक त्यांना स्वीकारत आहेत, तसेच बॉक्स ऑफिसवर त्यांचे चित्रपट यशस्वी होत आहेत.

# मनात साठलेला राग ते दुसऱ्यावर काढत असतात



जेव्हापासून सोशल मीडियाचा काळ सुरू झाला, तेव्हापासून चित्रपट कलाकारांच्या प्रत्येक हालचालीवर लोकांचे, त्यांच्या चाहत्यांचे लक्ष असते. काही सेलिब्रिटीजना लोकांचे प्रेम मिळते, तर त्याचबरोबर ऑनलाइन तिरस्कार देखील झेलावा लागतो. अभिनेत्री क्रिती सेनॉनच्या बाबतीत देखील असेच काहीसे घडले आहे. 'मिमी' या सिनेमासाठी अभिनयाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळवलेल्या क्रितीने ही गोष्ट आता स्वीकारली आहे की सोशल मीडियावर तिला प्रेम आणि तिरस्कार यांचा सामना करावा लागतो. परंतु या तिरस्कारामुळे ती निराश होत नाही. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये क्रितीने याविषयी भाष्य केले. ती म्हणाली की, मी लोकांनी केलेल्या कॉमेंट्सना महत्त्व देत नाही, कारण मला वाटतं की कुणी आपल्या मनात साठलेला राग दुसऱ्यावर काढत असतो. त्यामुळे मी अशा कॉमेंट्सना गंभीरतेने घेत नाही. क्रितीने पुढे सांगितले की, मला असे वाटते की मी कुणाला ओळखत नाही, तर त्या व्यक्तीला मला उत्तर देणे गरजेचे आहे का? सोशल मीडियाचा चांगला उपयोग मी करते. त्याद्वारे मी माझ्या चाहत्यांशी जोडली जाते. चित्रपटसृष्टीतील लोकांशी जोडली जाते. मला असे देखील वाटते की, एक-दोन वर्षांमध्ये माझे दोन किंवा तीन चित्रपट येतात. कधी कधी तर वर्षभरामध्ये माझा एकही सिनेमा प्रदर्शित होत नाही. त्यामुळे सोशल मीडियामार्फत मी चाहत्यांशी जोडून असते. नाहीतर सोशल मीडियामुळे तुम्ही लोकांच्या आठवणीत असता असे अजिबात नाही.

# नवाकाळ शब्दकोडे-१३५१



**आडवे शब्द –**

२. न समजणारी गोष्ट, गूढ ६. लेखक ९. तीव्र इच्छा ११. कडवे वाल १३. म्हैस १४. सुमार दर्जाचे १६. शेती १७. ताब्यात घेणे, कब्जा करणे १९. संधी २०. दह्यापासून केलेले पेय २१. लहानपण, बाल्य २२. गमन २३. कंपनीत गुंतवलेली रक्कम, शेअर कॅपिटल २५. लाकडी पळी २७. अस्वस्थता, व्याकूळता ३०. असत्य हकीकत ३३. देऊन टाकणे, पाणी सोडणे ३४. मधुर ३५. सहजी न तुटणारे ३६. केवळ अंदाज ४०. कनक, कांचन ४१. हाक ४२. एक प्रकारची बांगडी ४३. नेहमी ४४. अनासक्त ४५. बूड, खालचा भाग ४६. नमस्काराचा शब्द ४८. फुलाचे पूर्वरूप ५१. सूर्यमालेतील सगळ्यात मोठा ग्रह ५२. पत्रास, बूज ५३. फुफ्फुसांचा गंभीर आजार, अस्थमा ५५. द्रौपदीचे एक नाव; वाईची प्रसिद्ध नदी ५६. फोडणीतले सुगंधी पान ५९. योगदान ६०. नियमित पुरवठा ६२. बाणांची पिशवी, भाता ६५. खांबावर आडवी टाकलेली तुळई ६६. आई ६७. ढीग ६८. बायको ७०. ललाट ७३. मोठी बसकी, पसरट टोपली, हारा ७५. मायेची सावली ७६. पाण्यातील भयंकर प्राणी ७८. फिरणे ७९. ठाणे ८१. अग्नी, ज्वाला ८२. रक्तवाहिनी ८३. दिवटी ८४. मधला भाग, गाभा ८५. रस्ता, मार्ग ८७. अंगठा आणि तर्जनीच्या टोकांमधील किमान अंतर ८८. उलगडा ९०. बक पक्षी ९३. पाणकोंबडी ९५. मित्र ९७. फोडणीचे वरण ९८. पूर्वी भांड्यांसाठी वापरला जाणारा पिवळा मिश्र धातू १००. दोन बोटांचे माप १०२. आनंदावर पाणी पडणे, हिरमोड १०३. संचय १०४. आनन १०५. मेंढा १०७. मोकळीक १०८. असमर्थ १०९. तेल लावून डोक्याला मालिश ११०. पावसाळ्यात येणारी एक रानभाजी, तरोटा, चक्रमर्द १११. भित्रा ११२. बेसन लावलेल्या ताकाचा पदार्थ ११३. अडचण ११४. शेकोटी

**उभे शब्द –**

१. मश्रूम ३. बहरणे, फुलणे ४. नगर ५. घाई, धावपळ ७. ओढून घेणे ८. कडवटपणा ९. छाती १०. शेतकरी ११. दरोडेखोर १२. यातून रोप अंकुरते १५. टेंभा १६. हडकुळा १८. भांडखोर स्त्री १९. सुट्टे पैसे, चिल्लर २१. लकब, धाटणी २३. पाळलेली मांजर २४. गोंधळलेला २६. ओझे, भार २८. संकट, अरिष्ट २९. यथेच्छ ३०. खोड्या काढणारा ३१. मनुष्य ३२. संकट ३६. हळुवारपणे ३७. नुकसानकारक ३८. धास्ती ३९. दर्भाची अंगठी ४५. झाड ४६. गायीम्हशीचे आचळ ४७. थोरवी, माहात्म्य ४९. लेखनिक, क्लार्क ५०. कांदा ५१. दारूचे दुकान ५२. वेदांची संख्या ५४. कुरघोडी ५७. उडणाऱ्या पतंगाचा दोरा सैल सोडणे; शिस्तीतील सवलत ५८. प्रभाव ५९. भीती ६०. अतिशय तप्त ६१. जर्दाळूचे बी ६३. शान, दिमाख ६४. गाडा ६६. पिछाडीला ६७. भस्म ६९. क्रोध ७१. विड्याच्या पानांच्या वेली असलेला मळा ७२. साळुंकी ७४. माळ ७५. कानाची कड ७७. शकुन बघण्याची विद्या ७८. अर्थात ८०. दुष्ट बेत ८१. छळ ८६. पाण्याचे पसरट व मोठे भांडे ८७. मोत्याचा दागिना, भक्कम लाकडाचा एक प्रकार ८८. बोध, आकलन ८९. कंबर ९१. मुस्कटदाबी ९२. याकरिता, म्हणून ९४. बंदुकीची लाकडी मूठ ९५. नात्यातील, सख्खा ९६. बारीकसारीक तपशील ९७. सुरुवात ९८. गुत्ता ९९. तीळाची एक जात १०१. प्रतिशोध १०२. एक अप्सरा १०३. बैरागी १०६. कंटक १०७. पांढऱ्या रंगाची आणि उग्र वासाची एक कंदभाजी १०८. पूर्वग्रह, कलुषित मत १०९. पानसडी, पानसुपारीचे साहित्य असलेला बटवा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३५०चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. विवर ३. तेज:पुंज ६. राहू ७. गुंफण १०. टंचाई ११. जिव्हा १२. डागडुजी १४. वंगण १५. रास १६. जीव १७. खवा १८. लवलेश २०. कारागीर २१. जीवित २३. लकडा २५. वाकी २६. पारा २७. निगरगट्ट २९. हिव ३०. काकाकुवा ३४. आमरण ३५. रहित ३७. बंडी ३८. धीरोदात्त ४०. गय ४१. धुरा ४३. तकलादू ४५. फळकूट ४७. समाधान ४९. रजक ५०. पारखा ५२. आरोळी ५३. फाका ५६. धनवान ५८. क्षतज ६०. ढास ६२. कोरफड ६४. रण ६५. ऐश्वर्य ६६. हमाली ६८. लस्सी ६९. अंगारकी ७०. प्यादे ७१. तर ७३. बेलवांगे ७५. वदन ७८. मदालसा ७९. चपला ८१. बचाव ८३. गगन ८५. नवल ८८. रस निकड ९०. वक्तशीर ९१. रमतगमत ९४. राबता ९६. शिसा ९७. बदनाम १००. जाळ १०१. चाक १०३. गडवा १०४. रणगाडा १०६. सोपान १०७. उपसागर १०८. नगद १०९. सक्त

**उभे शब्द** : १. विचारविनिमय २. वई ३. तेव्हा ४. पुंडावा ५. जग ६. राजीव ७. गुंग ८. फणकारा ९. विसर ११. जिवलग १३. डुलकी १४. वंश १५. रागीट १७. खडा १९. लेखिका २२. तगर २४. कट्टर २५. वाव २६. पावा २८. रणधुमाळी २९. हितकर ३०. काडी ३१. कुदळ ३२. युरो ३३. वित्त ३४. आगटी ३६. हित३७. बंदूक ३८. धीट ३९. दादर ४२. राधा ४४. लाजरा ४५. फत्ते ४६. कूजन ४७. सरोज ४८. नफा ५०. पान ५१. खाजण ५२. आतल्या गाठीचा ५४. काढा ५५. धूर ५६. धड ५७. वाघ ५९. अश्व ६१. सहदेव ६२. कोलीत ६३. फड ६४. रस्सी ६५. ऐकीव ६७. जलसा ६८. लगेच ७२. रमल ७३. बेलगाम ७४. खलास ७६. दगड ७७. नग ८०. परत ८१. बळीराजा ८२. वनिता ८४. नवसागर ८५. नशीबवान ८६. वरद ८७. संग ९१. रमण ९२. तगडा ९३. मनसोक्त ९५. बळ ९८. नारद ९९. धनको १०१. चाप १०२. कसा १०५. गाज

# ६५ लाख मतदारांना आधारसह नाव नोंदणीची संधी

पान १ वरून

बँक पासबुक, पाणीपट्टी आदी कागदपत्रांचा समावेश आहे. यावेळी निवडणूक आयोगाने राजकीय पक्ष एसआयआर प्रक्रियेवर तावातावाने बोलत आहेत. पण आयोगाकडे अजूनपर्यंत एकही हरकत नोंदवण्यात आलेली नाही. राजकीय पक्षांचे १ लाख ६१ हजार बूथ लेवल एजंट आहेत. एक बीएलए एका दिवसात दहा हरकत किंवा सूचना सादर करू शकतो. दुसरीकडे एसआयआरचा मसुदा जाहीर झाल्यानंतर स्वतः २ लाख ६३ हजार नागरिकांनी मतदार नोंदणीसाठी अर्ज केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने खडेबोल सुनावत राजकीय पक्षांच्या निष्क्रियतेवर आश्चर्य व्यक्त केले. राजकीय पक्षांनी मतदारांना मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे, असे निर्देश दिले. १२ पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांना नाव वगळलेल्या मतदारांची मदत करण्याच्या सूचना देण्यास सांगितले. गेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने मतदार यादी मसुद्यातून वगळण्यात आलेल्या ६५ लाख लोकांची यादी कारणांसह सार्वजनिक करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले होते. दरम्यान, काही याचिकाकर्त्यांनी राजकीय पक्षांच्या बीएलएनी हरकती नोंदवल्यानंतर निवडणूक आयोगाच्या बीएलओंकडून पोचपावती दिली जात नसल्याचा मुद्दा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. त्यावर न्यायमूर्तींनी प्रत्यक्ष अर्ज सादर केल्यानंतर पोचपावती देण्याचे निर्देश आयोगाला दिले. बिहारमधील या मतदारयादी पडताळणी मोहिमेला मुदतवाढ देण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. पण गरज पडली, तर आगामी काळात ती वाढवण्याचा विचार करू, असेही स्पष्ट केले. बिहारमध्ये एसआयआरच्या पहिल्या टप्प्यात १ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. मसुदा यादीवर १ सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आहे. यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

# हिंदू नावे वापरू नका! मुस्लीम बँडवाल्यांना तंबी

पान १ वरून

पथकांची नावे हिंदू देव-देवतांवरून आहेत. त्यामुळे धार्मिक भावना दुखावतात. मुस्लीम बँड मालकांनी हिंदू नाव न वापरता आपली मुस्लीम अशी ओळख स्पष्ट होईल, अशी नावे वापरावीत. यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना मोरादाबादचे पोलीस अधीक्षक कुमार रणविजय म्हणाले की, नावे बदलण्याचे आदेश देण्याचा अधिकार आम्हाला नाही. आम्ही केवळ दोन्ही धर्मांच्या बँड पथक मालकांना एकत्र बोलावून उभयमान्य तोडगा काढण्याचा प्रयत्न केला आहे. वकील शावी सिंग यांनी आपल्या तक्रारीचे समर्थन करत म्हटले की, हा धर्माचा मुद्दा नाही, तर फसवणुकीचा मुद्दा आहे. तर मुस्लीम बँड मालकांनी म्हटले की, आम्ही वीस वर्षांपासून हा व्यवसाय करत आहोत. आमच्या गुरुच्या नावावरून आम्ही बँडला ही नावे दिली आहेत. आता आम्ही आधीच काही कार्यक्रमांची बुकिंग घेतली आहेत. त्यामुळे नाव बदलायला पोलिसांकडे थोडी मुदत मागितली आहे. यापुढील सगळी बुकिंग नव्या नावाने घेतली जातील.

# ओपन एआयचे नवी दिल्लीत पहिले कार्यालय

पान १ वरून

मिळणारा सरकारचा मजबूत पाठिंबा असे सर्व घटक आहेत. याठिकाणी पहिले कार्यालय उघडणे आणि स्थानिक टीम तयार करणे प्रगत एआय सर्वांपर्यंत पोहोचवण्याच्या आमच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वाचे पाऊल आहे.

ओपन एआयने आधीच जपान, सिंगापूर आणि दक्षिण कोरिया यांसारख्या आशियाई देशांमध्ये आपली कार्यालये सुरू केली आहेत. दरम्यान, कंपनीने याच आठवड्यात भारतीय वापरकर्त्यांसाठी केवळ ४.६० डॉलर मासिक शुल्क असलेला सर्वात स्वस्त चॅटजीपीटी प्लॅनही सादर केला. जवळपास १ अब्ज इंटरनेट वापरकर्त्यांचा देश म्हणून भारतात ओपनएआयला मोठी संधी आहे. परंतु भारतात गुगल जेमिनी आणि परप्लेक्सिटी एआय हे प्रतिस्पर्धीही असल्यामुळे ओपन एआयसमोर आव्हान आहे. या दोन्ही कंपन्यांनी काही प्रीमियम प्लॅन भारतात विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत.

# सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण अखेर एसआयटी स्थापन

पान १ वरून

केला आहे. हे तपास पथक अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करेल.

सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू पोलीस कोठडीत झाला होता. त्यांच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा नोंदला जात नसल्याने त्याची आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. न्यायालयाने पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. या आदेशाविरोधात पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला होता.

# तासगावात प्रेमीयुगुलाची विष पिऊन आत्महत्या

**तासगाव- एका** प्रेमीयुगुलाने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना तासगाव शहरातील सरस्वतीनगरात घडली. ते मूळचे तासगाव तालुक्यातील राजापूर गावचे रहिवासी होते. सतिश महालिंग देशमाने (३०) आणि अनिता रमेश काटकर (३५) अशी आत्महत्या केलेल्या प्रेमीयुगुलाची नावे आहेत. दोघेही विवाहित असून, सतिशला दोन मुले आहेत. तर अनिताला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. तिच्या पतीचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले आहे. तर सतिशची पत्नी आणि मुलगा राजापूर येथे राहतात. मात्र सतिश आणि अनिता आपले गाव सोडून तासगाव येथे भाड्याच्या खोलीत एकत्र राहत होते.

# भटक्या कुत्र्यांना दिलासा! त्याच जागी सोडणार

पान १ वरून

आणि एनसीआर भागासाठीच होती.

दरम्यान, लोकसभेत सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये कुत्रे चावण्याच्या ३७ लाखांहून घटना घडल्या. एकट्या दिल्लीत २०२४ मध्ये भटक्या कुत्र्यांनी माणसांना चावण्याचा २५ हजारांहून अधिक घटना घडल्या. यंदा केवळ जानेवारी महिन्यातच अशा तीन हजार घटनांची नोंद झाली.

**सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले?**

या निकालात न्यायालयाने म्हटले, की, भटक्या कुत्र्यांना सरसकट निवारागृहात ठेऊ नये. आतापर्यंत ज्या भटक्या कुत्र्यांना पकडून निवारागृहात ठेवण्यात आले आहे, त्यांनाही पकडलेल्या भागातच सोडून द्यावे. नसबंदी आणि लसीकरणानंतर कुत्रे सोडून द्यावेत. केवळ आजारी आणि पिसाळलेल्या कुत्र्यांनाच निवारागृहात ठेवण्यात यावे. यासोबतच न्यायालयाने सर्वच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटीस धाडली आहे. प्रत्येक पालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी खास जागांची सोय करावी. सार्वजनिक ठिकाणांशिवाय केवळ ठरवून दिलेल्या या जागांवरच कुत्र्यांना खाऊ घालावे. अन्यथा कारवाई करावी, असे न्यायालयाने सांगितले. खानपान जागेच्या सुविधेसाठी याचिका दाखल करणाऱ्या एनजीओला दोन लाख रुपये देण्यास सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, बृहन्मुंबई महानगरपालिका सीमा क्षेत्रातील व मा. डिस्ट्रीक्ट व सब रजिस्ट्रार मुंबई यांचे कार्यक्षेत्रातील RR १३३८ (१० / १२ मांडलिक रोड) आणि RR १३४८ (४३ / ४५ कुलाबा कॉजवे) कुलाबा, मुंबई ही मिळकत (यापुढे सदरहू मिळकत असे संबोधण्यात आले आहे) मुंबई पोर्ट ऑथोरीटी (पूर्वीचे मुंबई पोर्ट ट्रस्ट) यांचे मालकीची असून त्यांनी **मे. प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि.,** यांना कायदेशीररीत्या भाडेतत्वावरती दिलेली आहे.

दि. **२१ डिसेंबर २०१५** रोजी मुंबई पोर्ट ऑथोरीटी यांनी प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि., मध्यप्रदेश सरकार आणि भारत सरकार यांना एक महीन्याचे आंत सदरहू मिळकत रिकामी करून ताबा देण्याची औपचारीक सुचना दिली. तसेच दि. **२१ जानेवारी २०१८** रोजीचे पत्रानुसार मुंबई पोर्ट ऑथोरीटी यांनी वाढीव भाडेवाढ, इमारत दुरुस्ती काम, पोट-भाडे करार वैगरे बेकायदेशीर बाबींकरीता आक्षेप घेतलेला असून सदरहू मिळकतीच्या भाडेपट्टाकरारामध्ये, १९८६ नंतर स्वयंगतिक नुतनीकरणाचे कलम नमुद नाही असे नमूद केलेले आहे.

त्या अनुषंगाने मुंबई पोर्ट ऑथोरीटी यांनी प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. यांना कायदेशीर नोटीस पाठवून दि. ०१/०९/२००६ पासून लागू असलेले सुधारीत भाडेवाढीच्या प्रचंड मोठ्या रकमेच्या मागणी केली व त्यानंतर मुंबई पोर्ट ऑथोरीटी यांचे विश्वस्त मंडळ यांनी सरकारी स्थान (अप्रधिकृत भोग्यांची बेदखल) अधिनियम, १९७१ चे तरतुदींनुसार प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. यांचे विरुद्ध केस क्र. 205/2016 आणि 206/2016 दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. यांचे व्यवस्थापन अधिकारी यांनी सविस्तर विचाराअंती व सल्लामसलत केल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला आहे की सदरहू मिळकतीचा भाडेपट्टा हा मुळ मालक मुंबई पोर्ट ऑथोरीटी यांना जसे आहे तसे स्वरुपात समर्पित / परत करण्याचा आहे.

सदरहू मिळकत मुंबई पोर्ट ऑथोरीटी (पूर्वीचे मुंबई पोर्ट ट्रस्ट) यांचे मालकीची असून त्यांना सदरहू मिळकतीचा ताबा वरती उल्लेख केलेल्या कारणास्तव हवा असून वाढीव भाडेवाढ, दंड, इमारत दुरुस्ती काम, पोट-भाडे करार वैगरे बेकायदेशीर कृत्यांबाबत अनेकवेळा सुचना देऊन देखील भाडेकरू व कब्जेधारक यांनी आजतागायत सदरहू मिळकतीचा प्रत्यक्ष, खुला व निर्विवाद ताबा दिलेला नाही.

सबब सर्व संबधीतांना व RR १३३८ (१०/१२ मांडलिक रोड) आणि RR १३४८ ( ४३ / ४५ कुलाबा कॉजवे) कुलाबा, मुंबई या मिळकतीचे सर्व भाडेकरू व कब्जाधारक यांना सुचना व कायदेशीर नोटीस देण्यात येत आहे की, सदरहू मिळकत व त्यामधील प्रत्येक भाग, सदनिका, दुकाने वैगरे यांचा प्रत्यक्ष, खुला व निर्विवाद ताबा सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आंत प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. यांना देण्यात यावा. सदरहू नोटीसची अंमलबजावणी न झाल्यास सदरहू मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा मिळविण्याकरीता प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि. योग्य ती कायदेशीर कार्यवाही सुरु करतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी

**सही / अनिल कुमार धाकड़- मॅनेजर,**
**मे. प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी लि.,**
११/ओ, एडवर्ड व्हिला, कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग
कफ परेड, मुंबई - ४००००५.

**दिनांक : २३.०८.२०२५**



## SBI भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ००८०५८२० | कालिका प्रसाद भगत<br>पुष्पा भगत | ६७० | ६४५२१ | ६४५२२ | ७३८८८४७८६१ | ७३८८८४८५३० |
| २ | ००८५४९८१ | सत्य प्रकाश शर्मा<br>बिमला देवी<br>अनिल कुमार | ६४० | ८३५९० | ८३५९१ | ७३९३७४३४५१ | ७३९३७४४०९० |
| ३ | ००७७५२९३ | सुरेश बाबू<br>चन्द्र शेखर | ६३० | ५३०६५ | ५३०६६ | ७३८६०७६९५१ | ७३८६०७७५८० |

**वरील आकडे रु. १/– दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई — समभागांची संख्या: **१९४०** — महाव्यवस्थापक
**दिनांक:** २३.०८.२०२५ — स.प्रमाणपत्रांची संख्या: **६** — (शेअर्स व बॉण्ड्स)



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्र. /२१/२०२५ (मुदतवाढ)**

दि. ०७/०८/२०२५ रोजी नवाकाळ, मुंबई या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सूचना क्र. २१ सन २०२५ मधील खालील कामासाठी ई-निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| अ) | **का.अ., मऔविम, माहिती तंत्रज्ञान विभाग, पुणे.** | |
| १ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.१ व २ रस्ते देखभाल व दुरूस्ती... रस्त्याच्या हद्दीतील व महामंडळाच्या भूखंडावरील अतिक्रमण काढणे व देखरेख करणे. | ३९,६०,१५२/- |
| ३ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.३ रस्ते देखभाल व दुरूस्ती... वार्षिक कालावधीसाठी बाणेर संपर्क रस्त्याच्या काही भागाची दुरूस्ती व खड्डे भरणे. सन २०२५-२६ | ३९,८३,८४६/- |
| ५ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र. २ रस्ते देखभाल व दुरूस्ती... क्रोमाजवळ ६०० मी.मी. व्यासाची RCC पाईप लाईन टाकणे व विप्रोपासुन बटरफ्लाय ट्रम्पोलिन पार्क या दरम्यान गटार दुरूस्ती करणे. | ३९,८६,१८५/- |
| ६ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी टप्पा क्र.३ रस्ते देखभाल व दुरूस्ती... वार्षिक कालावधीसाठी टप्पा क्र.३ मधील रस्त्याची दुरूस्ती करणे व रस्त्यावरील खड्डे भरणे. | ३९,९२,९८७/- |
| ब) | **का.अ., मऔविम, विवयां विभाग, पुणे.** | |
| २ | रांजणगाव औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अशुध्द उर्ध्व जलवाहिनीवरील पाण्याची चोरी थांबविण्याकरीता दैनंदिन उर्ध्वजलवाहिनीची पाहणी करणे. | १८,९९,८२५/- |
| क) | **का.अ., मऔविम, प्रकल्प विभाग, पुणे.** | |
| १ | चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २.... भूखंड क्र. PAP-V-१४४ ते PAP-V-१४९/१० च्या दरम्यान पावसाचे पाणी वाहून नेण्याकरीता ६०० मी.मी. व्यासाचे RCC पाईप पुरविणे व जोडणे. | ९,२४,९२०/- |

वरील कामांची कोरी ई-निविदा **(www.mahatenders.gov.in)** संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी वाढविण्यात आला असून सदर कालावधी दि. ०२/०९/२०२५ पर्यंत आहे. या व्यतिरिक्त निविदा सूचनेमधील इतर बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



## SOUTH INDIAN Bank

Experience Next Generation Banking

**दि साऊथ इंडियन बँक लि.**
संकलन आणि वसुली विभाग
मुंबई विभाग, तळमजला, "सी" इमारत वित्रापूर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, पांडुरंग मार्ग, २७ वा रस्ता, वांद्रे पश्चिम, मुंबई, पिन - ४०० ०५०.

**संदर्भः MUM/REC/MSME/101/2025-26** — **दिनांकः २२.०८.२०२५**

**ई-लिलाव विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२च्या नियम ८(६) आणि ९(१)च्या शर्तीसह वाचावयाच्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

**कर्जदारः १) मे. रोबस्टर कन्स्ट्रक्टवेअर एलएलपी**, प्रतिनिधित्व द्वारा त्यांचे नियुक्त भागीदार, कार्यालय क्र. १०३, न्यू प्रभात बिल्डींग घोरुपडे क्रॉस लेन क्र. १, रामभाऊ भोगले मार्ग, भायखळा पूर्व, मुंबई-४०००३३.

**तसेच येथेहीः** ए/९१-९२, कुरकुंभ एमआयडीसी, पुणे सोलापूर रोड, कुरकुंभ दौंड. महाराष्ट्र - ४१३८०२.

**आणि** ३९, मैसूर कॉलनी, माहुल रोड, आणिक गाव, चेंबूर पूर्व, मुंबई-४०००७४.

**जामीनदारः २) सौ. रिटा किशोर मोटवानी**, ३९, मैसूर कॉलनी, माहुल रोड, आरसीएफ फॅक्टरी गेट क्र. २च्या जवळ, चेंबूर, एफसीआय मुंबई, मुंबई, महाराष्ट्र-४०००७४.

**३) श्री. विनायक किशोर मोटवानी**, ३९, मैसूर कॉलनी, माहुल रोड, आरसीएफ फॅक्टरी गेट क्र. २च्या जवळ, चेंबूर, एफसीआय मुंबई, मुंबई, महाराष्ट्र-४०००७४.

**४) सौ. कामिनी देवी गुरबक्ष मोटवानी**, ३९, मैसूर कॉलनी, माहुल रोड, आरसीएफ फॅक्टरी गेट क्र. २च्या जवळ, चेंबूर, एफसीआय मुंबई, मुंबई, महाराष्ट्र-४०००७४.

सर्वसाधारण जनता आणि विशेषतः कर्जदार/जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, दि साऊथ इंडियन बँक लि. (प्रतिभुती धनको) यांच्याकडे गहाणवट निम्न उल्लेखित स्थावर मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड (प्रतिभुती धनको) चे प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे, ती उपरोल्लेखित कर्जदार/जामीनदार यांच्याकडून दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड, शाखा गोरेगाव-मुंबई (प्रतिभुती धनको) यांना देय असलेली दि. २१.०८.२०२५ रोजीनुसार रु. १७,४८,९४,८७८.७२ (रुपये सतरा कोटी अठ्ठेचाळीस लाख चौऱ्याण्णव हजार आठशे अठ्ठ्याहत्तर व पैसे बाहत्तर मात्र) व त्यावरील भविष्यातील व्याज, शुल्क आणि खर्चाच्या वसुलीकरिता दि. १६.०९.२०२५ रोजी "जसे आहे जेथे आहे" तत्त्वावर, "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे" शर्तीवर विक्री करण्यात येईल.

| |
|---|
| **मालमत्तेच्या मालकाचे नावः** श्री. विनायक किशोर मोटवानी |
| **मालमत्तेचे वर्णनः** भेट करारनामा, उप निबंधक कार्यालय कुर्ला - I चा क्र. केआरएल-१-७५४९-२०१९ दिनांक ११.०६.२०१९ मध्ये पूर्णतः वर्णन केलेला, आणिक गाव, चेंबुर तालुका, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या सीटीएस क्र. ११७ अंतर्गत दि मैसूर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या मैसूर कॉलनीमध्ये स्थित शाश्वत भाडेपट्ट्या भूखंड क्र. ३९ मोजमाप ४८०.४० चौ.मीटर्समध्ये बांधलेला निवासी बंगलो मोजमाप २४४.६१ चौ.मीटर्स नेट कार्पेट क्षेत्रफळ (एफएसआय वापरलेले क्षेत्रफळ) व त्यासह त्यावरील इतर सर्व बांधकामे, सुधारणा, विद्यमान आणि संबंधित वहिवाटी हक्क चे सर्व खंड आणि तुकडे आणि मालकी श्री. विनायक किशोर मोटवानी, आणि चतु:सीमा **उत्तरः** रस्ता, **पूर्वः** सीटीएस क्र. ११८ धारण केलेला भूखंड, **दक्षिणः** रस्ता, **पश्चिमः** सीटीएस क्र. ११६ धारण केलेला भूखंड. |
| **राखीव किंमतः** रु. ९,७३,४८,०००/- (रुपये नऊ कोटी त्र्याहत्तर लाख अठ्ठेचाळीस हजार मात्र) |
| **इसारा रक्कम अनामत (ईएमडी):** रु. ९७,३४,८००/- (रुपये सत्याण्णव लाख चौतीस हजार आठशे मात्र) ईएमडी दि. १५.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ०४.०० वाजेपर्यंत जमा करावी. |
| **बोली विस्तार रक्कमः** रु. ५०,०००/- |
| **ई-लिलावाचा दिनांक आणि वेळः** दि. १६.०९.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० पर्यंत (विक्री पूर्ण होईपर्यंत ५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं विस्तारासह) |
| **बँकेस ज्ञात असलेले बोजेः** दि. १५.०६.२०१९ ते दि. ०८.०५.२०२५ पर्यंत शुन्य बोजे |

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता, कृपया साऊथ इंडियन बँक लि. (प्रतिभुती धनको)च्या वेबसाईट म्हणजेच www.southindianbank.com या वेब पोर्टलमध्ये दिलेली लिंक पहावी. तपशील https://bankauctions.com येथे देखील उपलब्ध आहेत.

मालमत्तेची पाहणी, ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती किंवा बोलींचे सादरीकरण यासंबंधी कोणत्याही अधिक स्पष्टीकरणाकरिता, कृपया दि साऊथ इंडियन बँक लि., शाखा गोरेगाव यांना कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा साऊथ इंडियन बँक लि., संकलन आणि वसुली - मुंबई येथे ९४४६८९४५११/९०७४५६३९१५ येथे संपर्क करावा.

**दिनांकः २२.०८.२०२५** — **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाणः मुंबई** — **(सहाय्यक महा व्यवस्थापक)**

नवा काळ

• मुंबई । शनिवार २३ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# चित्रपट पाहूनच हायकोर्ट 'अजेय'चा निर्णय देणार

**मुंबई -** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या जीवनावर आधारित 'अजेय-द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी' या चित्रपटाचा वाद मुंबई उच्च न्यायालयात गेला असून, न्यायालयाने हा चित्रपट प्रत्यक्ष पाहूनच निर्णय घेऊ, असे सुनावणीत सांगितले आहे. सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटात २९ दुरुस्त्या सुचविल्या. त्यात निर्मात्यांनी मुख्यमंत्री योगी यांच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर न केल्याचे कारण देत चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. सेन्सॉर बोर्डाच्या या निर्णयाला निर्मात्यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. सुनावणीत निर्मात्यांच्या वतीने ॲड. रवी कदम यांनी युक्तिवाद केला. चित्रपटाला प्रमाणपत्र नाकारण्याने निर्मात्यांच्या मूलभूत हक्कांवर गदा येते, असे ॲड. कदम यांनी सांगितले. त्यावर सेन्सॉर बोर्डाच्या भूमिकेबद्दल असमाधान व्यक्त करत ॲड. रेवती मोहिते-डेरे आणि ॲड. नीला गोखले यांच्या खंडपीठाने चित्रपट स्वत: पाहून निर्णय घेऊ, असे सांगितले. या चित्रपटातील सेन्सॉर बोर्डाने दुरुस्ती सुचविलेले भाग अधोरेखित करून चित्रपटाची प्रिंट न्यायालयात सादर करावी, असे आदेश न्यायालयाने दिले. पुढील सुनावणी २५ ऑगस्टला होणार आहे.




## उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी दौंडच्या तरुणाकडून उमेदवारी अर्ज दाखल

■ नवी दिल्ली



**दौंड** तालुक्यातील सहजपूर गावचा तरुण उमेश म्हेत्रे यांनी थेट उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी त्यांनी नवी दिल्लीतील राज्यसभा दालनात निवडणूक निर्णय अधिकारी पी. सी. मोदी व गिरीमा जैन यांच्याकडे हा अर्ज सादर केला. यावेळी आवश्यक कागदपत्रांसह १५ हजार रुपयांचे डिपॉझिटही त्यांनी जमा केले. एका साध्या ग्रामीण पार्श्वभूमीच्या तरुणाने देशाच्या सर्वोच्च पदांपैकी एका पदासाठी अर्ज केल्याने सर्वत्र चर्चा रंगली आहे. उमेश म्हेत्रे यांनी याआधी विधान परिषदेच्या निवडणुकीसाठीही अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र विधान परिषदेच्या उमेदवारीसाठी १० आमदारांचा पाठिंबा आवश्यक असतो. तो पाठिंबा न मिळाल्याने त्यांचा अर्ज बाद करण्यात आला होता.

## पत्रकार थापर, वरदराजनच्या अटकेला कोर्टाची स्थगिती

■ नवी दिल्ली

**देशद्रोहाच्या** आरोपावरून आसाम पोलिसांनी गुन्हा दाखल केलेले पत्रकार करण थापर आणि सिध्दार्थ वरदराजन यांच्या अटकेला सर्वोच्च न्यायालयाने आज स्थगिती दिली. थापर आणि वरदराजन यांच्याविरोधात आसाम पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ अन्वये गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात त्यांना पोलिसांच्या गुन्हे शाखेने समन्स बजावले होते.

या समन्सला वरदराजन आणि थापर यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या आव्हान याचिकेवर आज न्या. सूर्यकांत आणि न्या. ज्योयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने दोन्ही आरोपींना पोलिसांच्या तपासात संपूर्ण सहकार्य करण्याच्या अटीवर अटकेपासून तात्पुरता दिलासा दिला. याप्रकरणी पुढील सुनावणी १५ सप्टेंबर रोजी होणार असून, तोपर्यंत आरोपींवर अटकेची कारवाई करू नये, असे आदेश न्यायालयाने दिले.

## पुण्यात गणपती विसर्जनाचा वाद मिरवणूक आता ८ वाजता निघणार

■ पुणे

**पुण्यातील** गणपती विसर्जन मिरवणुकीवरून पेटलेला वाद आज अखेर मिटला. दरवर्षी मानाच्या गणपतींची मिरवणूक सकाळी ११ वाजता सुरू होते. आता ती सकाळी ८ वाजता निघणार आहे. त्यानंतर इतर मंडळांचे गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतील. पुण्यातील गणेश मंडळांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

याबाबत पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी बैठक घेतली होती. त्यात कुठलाही तोडगा निघाला नाही. त्यानंतर आज पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सर्किट हाऊस येथे बैठक घेतली. या बैठकीला मानाचे गणपती मंडळाचे प्रतिनिधी आणि मध्यवर्ती भागातील आणि विसर्जन मिरवणुकीत लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, टिळक रस्त्यावरून सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुण्याच्या विसर्जन मिरवणुकीत पहिल्या पाच मानाच्या गणपती मंडळांनंतर लगेच सहभागी होण्याचा निर्णय अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाने घेतला होता. त्यानंतर इतर मंडळांनी मानाच्या पाच गणपतींच्या आधी मिरवणूक सुरू करण्याची भूमिका घेतली होती. त्यामुळे मिरवणुकीचा वाद चांगलाच पेटला होता. आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर मानाच्या ५ मंडळांनी मिरवणूक लवकर काढण्याचा निर्णय मान्य केला.

## १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांची नोंदणी महागली! शुल्कात दुप्पट वाढ

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने जुन्या वाहनांच्या नोंदणी शुल्कात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पंधरा वर्षांपेक्षा जास्त जुन्या वाहनांचा वापर कमी करण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली.

मंत्रालयाने जाहीर केल्या अधिसूचनेनुसार, पंधरा वर्षांपेक्षा जुन्या मोटरसायकलच्या रजिस्ट्रेशनसाठी २ हजार रुपये मोजावे लागतील. तीन चाकी वाहनांना ५ हजार, कार, जीप, व्हॅन आणि वैयक्तिक किंवा व्यावसायिक वापरातील लहान ट्रक यांना १० हजार रुपये मोजावे लागतील. परदेशातून भारतात आणलेल्या २ किंवा ३ चाकी वाहनांना २० हजार रुपये तर ४ चाकी वाहनांना ८० हजार रुपये भरावे लागणार आहेत. इतर मोठ्या वाहनांना १२ हजार रुपये भरावे लागणार आहेत. जुन्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण आणि त्यांची देखभाल खर्चिक असल्याने, त्यांचा वापर कमी व्हावा हा यामागील मुख्य उद्देश आहे. या निर्णयामुळे वाहनधारकांवर आर्थिक भार पडणार असला तरी, पर्यावरणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## तारापूरमध्ये वायूगळती ४ कामगारांचा मृत्यू

■ पालघर

पालघरच्या बोईसर-तारापूर एमआयडीसीमधील एका औषधनिर्मिती कारखान्यात वायूगळती झाली. यात गुदमरून ४ कामगारांचा मृत्यू झाला तर आणखी चार जणांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर बोईसर येथील शिंदे खासगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. एमआयडीसीतील प्लॉट नंबर एफ १३ मधील मेडली फार्मासिटिकल्स लिमिटेड या कंपनीत काल दुपारी ३ वाजताच्या सुमारास नायट्रोजन रिॲक्शन टँकमध्ये ही वायुगळती झाली. कल्पेश राऊत, बंगाली ठाकूर, धीरज प्रजापती आणि कमलेश यादव अशी मृत कामगारांची नावे आहेत. तर रोहन शिंदे, निलेश हाडळ यांच्यासह आणखी २ कामगारांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## मराठा उपसमितीचे पुनर्गठण अध्यक्षपदी राधाकृष्ण विखे-पाटील

■ मुंबई

**मराठा** समाजाच्या विविध प्रश्नांबाबत स्थापन करण्यात आलेल्या राज्य मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची निवड करण्यात आली आहे. या उपसमितीच्या अध्यक्षपदी ऑक्टोबर २०२२ मध्ये चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती झाली होती. मराठा समाजाची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि इतर विषयांवर शिफारसी करण्यासाठी सरकारने उपसमितीचे पुनर्गठण केले.

या उपसमितीत एकूण उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील या ११ कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील २९ ऑगस्टला मुंबईवर धडक देणार आहेत. त्यापूर्वीच सरकारने हा निर्णय घेतला.

## कोकिलाबेन अंबानी यांना रुग्णालयात दाखल केले

■ मुंबई



**रिलायन्स** समूहाचे संस्थापक दिवंगत धीरुभाई अंबानी यांच्या पत्नी आणि उद्योगपती मुकेश व अनिल अंबानी यांची आई कोकिलाबेन अंबानी यांना काल रात्री एच. एन. रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात दाखल केले. वयोमानानुसार झालेल्या त्रासामुळे आपत्कालीन स्थितीत एअर लिफ्ट करून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

कोकिलाबेन अंबानी यांचे वय ९१ वर्षे असून त्यांच्यावर सध्या वरिष्ठ डॉक्टरांच्या देखरेखीत उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीविषयी अंबानी कुटुंबाने अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन प्रसिद्ध केलेले नाही.

## हनी ट्रॅपवाल्या प्रफुल्ल लोढाला पिंपरी पोलिसांकडून अटक

■ पुणे

**हनी** ट्रॅप आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी प्रफुल्ल लोढाला पिंपरी-चिंचवड मधील बावधन पोलिसांनी आज अटक केली. लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात एका ३६ वर्षीय पीडितेने प्रफुल्ल लोढाविरोधात तक्रार दिली होती. याच गुन्ह्याच्या तपासासाठी पोलिसांनी लोढाला ताब्यात घेतले आहे. लोढाला बावधन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात यावे, यासाठी न्यायालयात हस्तांतरित वॉरंट मागण्यात आले होते. ती मंजुरी मिळताच आज सकाळी मुंबईच्या आॅर्थर रोड कारागृहातून पोलिसांनी लोढाचा ताबा घेतला. २७ मे रोजी लोढाने पीडित महिलेच्या पतीला नोकरी लावतो असे आमिष दाखवून महिलेला पुण्यातील बालेवाडी येथील नामांकित हॉटेलमध्ये बोलावले. तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. याआधी १६ वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी अंधेरी एमआयडीसी व साकीनाका पोलीस ठाण्यात लोढाविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

## रेखा गुप्ता यांच्या कार्यक्रमात कार्यकर्त्याने गोंधळ घातला

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर दोन दिवसांपूर्वी हल्ला झाला होता. त्यानंतर आज प्रथमच जाहीर कार्यक्रमाला हजर राहिलेल्या गुप्ता यांच्या कार्यक्रमात भाजपाच्याच एका कार्यकर्त्याने घोषणाबाजी केल्याने गोंधळ निर्माण झाला.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री गुप्ता यांच्या सुरक्षेत आज मोठी वाढ करण्यात आली होती. पूर्व दिल्लीतील गांधीनगर परिसरात मुख्यमंत्र्यांचा सहभाग असल्याने संपूर्ण परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तेवढ्यात एक कार्यकर्ता स्थानिक आमदार अरविंद सिंग लव्हली यांच्याविरोधात



जोरजोराने घोषणा देऊ लागला. त्यामुळे गोंधळ उडाला. पोलिसांनी त्या कार्यकर्त्याला तत्काळ ताब्यात घेतले. त्याचे नाव परवीन शर्मा (६०) असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## लंडन भुयारी रेल्वेचे कर्मचारी ५ सप्टेंबरपासून ७ दिवस संपावर

■ लंडन

**वाढीव** पगार आणि आठवड्याच्या कामात कपात करण्याच्या मागणीसाठी लंडनमधील भुयारी रेल्वेचे कर्मचारी ५ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने ७ दिवसीय संपावर जाणार आहेत. या संपात इंजिनिअर, स्टेशन कर्मचारी आणि ट्रेन ऑपरेटरसह अन्य कर्मचारी सहभागी होणार आहेत. या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी आरएमटी व्यवस्थापनाशी संपर्क साधत राहणार असल्याचे युनियनचे सरचिटणीस डेम्पसी यांनी सांगितले.

लंडन भुयारी रेल्वेचे ऑपरेशनल मॅनेजर ५ सप्टेंबरला संध्याकाळी ६ वाजल्यापासून ते ६ सप्टेंबरला संध्याकाळी ५.५९ वाजेपर्यंत कामबंद आंदोलन करणार आहेत. कंट्रोल सेंटरचे आणि पॉवर आणि इमर्जन्सी विभागाचे कर्मचारी ७ सप्टेंबरला सकाळी १२.०१ ते रात्री ११.५९ वाजेपर्यंत कामावर येणार नाहीत. ८ सप्टेंबरला सकाळी १२.०१ ते रात्री ११.५९ वाजेपर्यंत सर्व फ्लीट इंजिनिअर संप करतील. सिग्नल सर्व्हिस कंट्रोलचे कर्मचारी ९ सप्टेंबरला सकाळी १२.०१ ते रात्री ११.५९ दरम्यान संप पुकारतील. सर्व फ्लीट इंजिनिअर पुन्हा १० सप्टेंबर रोजी सकाळी १२.०१ ते रात्री ११.५९ वाजेपर्यंत आणि सिग्नल सर्व्हिस कंट्रोलचे कर्मचारी ११ सप्टेंबर रोजी सकाळी १२.०१ ते रात्री ११.५९ दरम्यान काम करणार नाहीत.

## अटल सेतूवर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

**मुंबई -** अटल सेतूवरून जाणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांना आजपासून टोलमाफी लागू करण्यात आली. २९ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील प्रमुख महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय सरकारी तसेच खासगी चारचाकी इलेक्ट्रिक गाड्या आणि बसेससाठी लागू आहे. सध्या अटल सेतूवर चारचाकी वाहनांसाठी २५० रुपयांचा टोल आकारला जातो. दररोज अंदाजे ६० हजार वाहने या पुलावरून प्रवास करतात. त्यात इलेक्ट्रिक वाहनांचीही लक्षणीय संख्या असते. राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी २०३० पर्यंत टोलमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी लागणारे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे आणि समृद्धी महामार्गावरही ही सवलत लागू होणार आहे.










## फोडलेल्या पक्षांकडे मते मागता? राऊतांचा फडणवीसांना चिमटा

■ मुंबई

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीवरून आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीवर (रालोआ) निशाणा साधला. तुम्ही जे पक्ष फोडलेत, त्याच पक्षांकडे मदत का मागता, असा बोचरा सवाल राऊत यांनी केला.

उप राष्ट्रपतीपदासाठी एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला ही गोष्ट खरी आहे. आम्ही त्याकडे शिष्टाचाराचा भाग म्हणून पाहतो. पण मला मुख्यमंत्री फडणवीस आणि रालोआच्या नेत्यांना विचारावेसे वाटते जे पक्ष तुम्ही फोडले त्याच पक्षांकडे मदत कशी काय मागता, तुम्हाला आंध्र आणि तेलंगणातील खासदारांची शाश्वती वाटत नाही की, ड्युप्लिकेट शिवसेनेवर तुमचा भरवसा नाही, असे राऊत म्हणाले.

यासंदर्भातील आपली भूमिका राऊत यांनी पुढे स्पष्ट केली. उप राष्ट्रपदीपदासाठी इंडिया आघाडीने एकमताने उमेदवार निश्चित केला आहे. बी सुदर्शन रेड्डी हे आमचे उप राष्ट्रपतीपदाचे उमेदवार आहेत. त्यांनाच आमचा पाठिंबा असेल. अन्य कोणाला पाठिंबा देण्याचा प्रश्नच येत नाही. सी पी राधाकृष्णन यांच्याबद्दल तर चर्चाही होऊ शकत नाही.त्यांनी मराठी उमेदवार दिला असता तर किमान चर्चा तरी होऊ शकली असती,असा तिरकस टोला राऊत यांनी लगावला.

## राजस्थानमध्ये पूरस्थिती २५० घरे पाण्याखाली गेली

■ जयपूर

**राजस्थानमध्ये** मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, सवाई माधोपूरमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. येथील पल्ली पार परिसरातील सुमारे २५० घरे पाण्याखाली गेली आहेत. आज उदयपूर, डुंगरपूर, बांसवाडा, प्रतापगड या ४ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. तर गुजरातमधील पोरबंदर जिल्ह्यात पावसामुळे पाणी साचू दुधाचा एक टँकर वाहून गेला. एनडीआरएफच्या पथकाने यात अडकलेल्या १३ जणांना सुखरूप वाचवले.

जम्मू- काश्मीरमध्ये, पूंछच्या मंडी सेक्टरमध्ये भूस्खलन झाले. यामुळे तेथील शाळेचा एक भाग कोसळला. जम्मू-काश्मीरमध्ये भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्गासह एकूण ३४७ रस्ते अजूनही बंद आहेत. याशिवाय २८१ ट्रान्सफॉर्मर आणि १४५ पाणीपुरवठा योजनादेखील विस्कळीत झाल्या आहेत. यंदा राज्यात सामान्यपेक्षा १७ टक्के जास्त पाऊस पडला आहे.




## तमिळ सुपरस्टार थलपती विजय स्वबळावर विधानसभा लढणार

■ चेन्नई

**तामिळ** सुपरस्टार थलपती विजय यांनी तामिळनाडूमध्ये होणाऱ्या २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत कुठल्याही राजकीय पक्षासोबत युती करणार नसल्याचे स्पष्ट केले.

मदुराई येथे झालेल्या आपल्या अर्थात तमिलगा वेंट्री कझग (टीव्हीके) या पक्षाच्या दुसऱ्या राज्यस्तरीय बैठकीत विजय यांनी भाजपा आणि द्रमुकसोबत युती न करण्याचा निर्णय घेतला. आपला पक्ष युतीत गुलामी करणार नाही तर स्वबळावर निवडणूक लढणार असे त्यांनी घोषित केले आहे. अभिनेता विजय म्हणाले की, माझा पक्ष तामिळनाडूतील सर्व २३४ जागांवर निवडणूक लढेल. जंगलात केवळ एकच शेर असतो आणि शेर कायम शेरच राहतो. मी राजकारणात स्वत:चा बाजार उघडण्यासाठी आलो नाही तर लोकांची सेवा करायला आलो आहे. भाजपा आपला एकमेव वैचारिक शत्रू आहे तर द्रमुक राजकीय शत्रू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तामिळनाडूच्या गरजांना कायम वंचित ठेवले आहे. भाजपा अल्पसंख्याक समुदायासोबत भेदभाव करत आहे.

## आंबेडकरांच्या पुतळ्याचे उद्घाटन केले नाही! राहुल गांधींबद्दल नाराजी

**मुंगेर -** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या मतदार हक्क यात्रेचा आज सहावा दिवस आहे. बिहारच्या मुंगेर येथील घोरघाटमध्ये गांधी आणि यादव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२ फुटी पुतळ्याचे लोकार्पण होणार होते. पण कार्यक्रमस्थळाला भेट देत प्रतिमा आणि कोनशिला बघून उद्घाटनाविनाच यात्रा पुढे रवाना झाली. स्थानिक लोकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पूर्णियाचे खासदार पप्पू यादव यांनी केवळ कोनशिलेचे उद्घाटन केले. त्यानंतर तेही राहुल गांधी यांच्या ताफ्यासोबत रवाना झाले. आज सकाळीच यात्रेच्या सुरुवातीला राहुल गांधी, तेजस्वी यादव यांनी खानकाह रहमानच्या मौलानासोबत जवळपास २० मिनिटे चर्चा केली.

